बुधवार, १७ मे २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०२ अंक -२४९

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●WEDNESDAY 17 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-249 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


# बुधवारपासून तापमानवाढ

## राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद विदर्भातील अकोला शहरात

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : राज्यात आणि विशेषत: विदर्भात तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअसच्या वर गेला असताना बुधवार, १७ मे पासून पुन्हा तापमानवाढीचा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. महाराष्ट्रातील अनेक भागात तापमान दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांत राज्यातील तापमानात सातत्याने बदल होताना दिसून येत आहेत. अवकाळी पावसानंतर राज्यातील काही भागांमध्ये तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअसवर जाऊन पोहोचला आहे.**

राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद विदर्भातील अकोला शहरात घेण्यात आली. तर उर्वरित शहरांमध्येदेखील हा पारा ४२ ते ४४च्या दरम्यान होता. सोमवारी तापमानात एक ते दोन अंशाची घट दिसून आली. त्यामुळे नागरिक सुटकेचा सुस्कारा सोडत असतानाच हवामान खात्याने हा तापमानवाढीचा इशारा दिला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात १५ मे पासून खात्याने उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला होता.त्यानुसार या दोन्ही विभागात ही लाट होतीच. आता त्यात पुन्हा एकदा तापमानवाढीचा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. नागरिकांनी या कालावधीत काळजी घ्यावी. दुपारच्यावेळी घराबाहेर पडणे टाळावे, असेही सांगितले आहे.



### चर्चेतली बातमी

## नितीन गडकरींना धमकी, निवासस्थानी सुरक्षेत वाढ

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी अज्ञात आरोपीनी फोन करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे नागपूर पोलिसांनी सावध पवित्रा घेत नितीन गडकरी यांच्या नागपुरातील निवासस्थानी आणि त्यांच्या संपर्क कार्यालयाच्या सुरक्षेत वाढ केली आहे. गडकरी यांच्या निवासस्थानी बॉम्बशोधक नाशक पथक तसेच सशस्त्र पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. नितीन गडकरी यांना यापूर्वी कर्नाटक मधील बेळगाव जिल्हा कारागृहातील जन्मठेपेचा आरोपी जयेश पुजारी याने १०० कोटी रुपयांची खंडणी मागून बॉम्बस्फोट करण्याची धमकी दिली होती. या प्रकरणात नागपूर पोलिसांनी जयेश पुजारी याला अटक करून त्याच्यावर य एपीए कायद्या अंतर्गत कारवाई केली आहे. सध्या जयेश हा एनआयए पथकाच्या ताब्यात आहे.








रणरणत्या उन्हात पारा वाढलेला असताना शेवगावात बंदोबस्तासाठी तैनात पोलिसांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याभोवती उभारलेल्या मंडपाच्या सावलीचा आधार घेतला. छायाचित्र : नीलकंठ कराड/शेवगाव.


# गोदावरीत अज्ञात व्यक्तीने मिसळले रसायन

## राम तेरी गंगा मैली हो गई : तिसऱ्यांदा प्रकार घडल्याने संताप

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** खेडलेझुंगे येथील गोदावरी नदीपात्रात अज्ञात व्यक्तीने रसायन मिसळले असून तिसऱ्यांदा हा प्रकार होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. येथील नागरिकांनी प्रशासनाकडे तक्रार करूनही दखल घेतली जात नाही. गुन्हेगाराचा तातडीने शोध न घेतल्यास मोठे जनआंदोलन करण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. अज्ञात व्यक्तीने गोदावरी नदीपात्रात रसायन मिसळल्याने दोन कि.मी.अंतरापर्यंत पाण्यावर हिरवा रंगाचा थर आला आहे. हे पाणी कानळद साठवण बांधाऱ्याकडे वाहत आहे. पाण्याला शौचसदृश्य दुर्गंधी निर्माण झाली आहे. हा परिसर पर्यटनस्थळ असून या परिसरात राष्ट्रीय दर्जाचे संतवन आहे. नजीकच आठवडी बाजार देखील भरतो. पंचक्रोशीतील गावे याठिकाणी दशक्रिया विधीसाठी येत असतात. खेडलेझुंगे परिसरातील गावे या पाण्याचा वापर नियमित करत असतात. त्यामुळे या पाण्याच्या दुर्गंधीने नागरिक त्रस्त झाले असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. सुरवातीला नागरिकांना ही पनवेली पासून झालेली प्रकिया वाटली मात्र या रसायनयुक्त पाण्यामुळे गोदावरी नदी पात्रातील जलचर प्राणी मरून वर तरंगले आहेत. गोदावरी नदीपात्रात रसायन टाकण्याची ही तिसरी वेळ असून पहिल्यांदा हा प्रकार झाला तेव्हा पोलीस प्रशासन, मंडळ अधिकारी यांनी धाव घेऊन पाहणी केली मात्र त्यानंतर हे प्रकरण मागे पडले. त्यामुळे पाटबंधारे खात्याने याकडे तातडीने लक्ष देऊन हे दुष्कृत्य करणाऱ्यांवर तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे. यावर तातडीने कार्यवाही न झाल्यास मोठे जनआंदोलन उभे करण्यात येईल असा इशारा नागरिकांनी दिला आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# कोण कुणाकडे राहतंय ?

आधुनिक केसरी

म्हणून तर साधुसंत म्हणतात, 'देह देवाचे मंदिर, आत आत्मा परमेश्वर..' घराप्रमाणेच एकदा का आपले ठरले की आपला देह हा सुद्धा देवाचे मंदिर आहे की मग आपण या देहाला पवित्र राखण्याचा प्रयत्न करू. माझ्या अंतरात वसलेल्या परमेश्वराला अमुक एक गोष्ट आवडणार नाही. त्याला आवडेल असे मला काय करता येईल असे आपण वागू. वाईट गोष्टी, व्यसने इ पासून आपोआपच दूर राहू. घराला, देहाला देवाचे मंदिर म्हणणे आणि त्याप्रमाणे आचरण करणे ही गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही. त्यासाठी मनाला तशी सवय लावावी लागेल. आजच्या संगणकाच्या भाषेत सांगायचे झाले तर आपल्या मनाचे तसे 'प्रोग्रॅमींग' करावे लागेल. पूर्वी आपल्या भारतीय संस्कृतीत जे चार आश्रम सांगितले होते, ते जीवन आचारण्याच्या दृष्टीने आदर्श असे होते. त्यातून आपल्याला आपल्या पूर्वजांची दूरदृष्टी दिसून येते. ब्रह्मचर्याश्रमात सगळे नियम पाळून गुरुगृही राहायचे, विद्या संपादन करायची. त्या काळात ज्ञान, आरोग्य यांची उपासना करायची. ही एक प्रकारची साधनाच असायची. ही साधना पुढील आयुष्यात कामी यायची. मग नंतर गृहस्थाश्रम. गृहस्थाश्रमात आपली कर्तव्ये पालन करून समाजाला आणि कुटुंबाला उपयोगी ठरेल अशा पद्धतीने आचरण करायचे. ब्रह्मचर्याश्रमात संपादन केलेल्या विद्येचा, कौशल्यांचा वापर करून सदाचरणाने धन मिळवायचे. अशा पद्धतीच्या गृहस्थाश्रम आचरता आला तर त्याला 'धन्य गृहस्थाश्रमः' असे म्हणायचे. पुढील वानप्रस्थाश्रमात संसारातील आसक्ती हळूहळू कमी करायची. ईश्वरभक्तीत रममाण व्हायचे अशी अपेक्षा होती. त्याप्रमाणे आपले पूर्वज हळूहळू मनाने विरक्ती स्वीकारीत असत. म्हणजे मग या संसाराच्या मोहमायेतून बाहेर पडणे त्यांना शक्य होई. गृहस्थाश्रम धन्य करून वानप्रस्थ आणि मग संन्यासाश्रम अशी त्यांची वाटचाल होत असे. आजच्या जीवनपद्धतीत हे सगळी आश्रमव्यवस्थाच विस्कळीत झाल्याने माणसाचा गोंधळ उडाला आहे. नात्यागोत्यात, जडात, पार्थिवात अडकलेले त्याचे मन बाहेर यायला तयार होत नाही.





## आनंदी पहाट

# समाधानातून आत्मशांती प्राप्त करावी

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात.

आपल्याला त्याव्यतिरिक्त आणखीन एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला,

अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनांतील सार कशांत आहे ? हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे. मिळेल त्यांत समाधानी राहावे असे म्हंटले जाते, पटते का आपल्याला ? जे काही मिळते त्यांत आपण खरेच समाधानी राहू शकतो का ? समाधानाचा संबंध थेट आपल्या अंतर्मनाशी असतो. त्यामुळे आपल्या अंतर्मनाला जोपर्यंत समाधान मिळत नाही, तो पर्यंत आपण मानसिक पातळीवर स्वास्थ्य मिळवू शकत नसतो. आपण करत असलेल्या सर्वच गोष्टी आपल्याला नेहमीच समाधान मिळवून देतातच असे नाही. आपण करत असलेल्या गोष्टींमध्येच आपण समाधान शोधत असतो. परंतू ज्या गोष्टी आपल्याला समाधान देतील त्यांची आपण निवड करतो का ? मानसिक स्वास्थ्य हे आपल्या भावनात्मक, कौटुंबिक आणि सामाजिक बाबींशी निगडीत असते. अनेकदा नकळत आपल्या अंतर्मनावर ताण येत असतो, तो जाणवत नाही आणि म्हणूनच कळतही नाही. अशावेळी आपल्या क्रिया आणि प्रतिक्रिया अनावधानाने बदलत जातात. त्यामुळे घेतलेले निर्णय आणि त्या दरम्यान इतरांशी होणारे आपले संवाद काहीवेळा विपरीत परिणाम करणारे ठरू शकतात. यासाठीच जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर अगदी बालपणापासून वृद्धार्पणापर्यंत मानसिक स्वास्थ्य महत्वाचे आहे.



आधुनिक केसरी

**शुद्ध आचरण | संतांसनगे ||**
गर्दभाच्या संगे | गंधर्व बिघडे ||
संगतीचे धडे | जाण मना ||१||
तामसी मनाचा | घडु नये संग ||
साधनेचा भंग | घात करी ||२||
सज्जन संगती | चंदन शितळ||
भाव परिमळ | सुगंधित ||३||
आपुल्या हीताचे | करावे जतन ||
ठेऊनिया भान | विवेकाचे ||४||
आता ऐक मना | मुक्तीचे साधन ||
शुद्ध आचरण | संतांसनगे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

कृपादानरतामम्बां
भक्तकल्याणकारिकाम्|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं
नमाम्यहम्|| १ ||
कृपादान करण्यात नेहमी रत
असणाऱ्या, भक्तांचे
कल्याण करणाऱ्या अशा
दुर्गा देवीला तीनही तापांच्या
शांतीसाठी मी नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

अविद्या रागहिं अस्मिता, अभिनिवेश द्वेष पञ्च । बन्धन कर्म ये दृढ़ करैं, क्लेश जरादि प्रपञ्च ।।२४४।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/२४४

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
अविद्या, आसक्ति, अस्मिता, अभिनिवेश आणि द्वेष हे पंचक्लेश कर्म-बंधन अधिक दृढ करणारे आहेत आणि जरा-मृत्यू -जन्य कष्टांना तसेच अन्य अनेक प्रापंचिक दुःखांना भोगण्यासाठी बाध्य करणारे आहेत.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## सुक्ष्म आशंकानिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ब्रम्हज्ञानी पुरूषाला सर्वत्र ब्रम्हस्वरूपचं दिसतं हे आपण अभ्यासलं आहे. त्याशिवाय त्याला दुसरं काही दिसत नाही. अज्ञानी पुरूषाला मात्र त्याच ब्रम्हस्वरूपामध्ये द्रुष्य जगाची अनुभूती येते. ब्रम्हस्वरूपामध्ये असे कोणतेही गुणधर्म नाहीत की ज्या ब्रम्हाच्या जोरावर त्याला ब्रम्हाची प्रचिती येईल. अशा वेगवेगळ्या स्थितीत


पण विरूध्द दिसणारे ब्रम्ह कसे दिसते. याचा आपण आता विचार करू.

**ज्ञानी पुरूषाचा अनुभव खरा आहे. वेदांतामध्ये यास "अजातवाद"असे म्हणतात हे आपण पाहिले आहे. अजातवाद हा वाद नाही तर तो ब्रम्हज्ञानी पुरूषाचा परमश्रेष्ठ अनुभव आहे. या बाजूने विचार केला तर हे जगचं निर्माण झाले नाही. तत्वद्रुष्ट्या हे मान्य करून देखील अज्ञानी पुरूषाचा जगाबद्दलचा अनुभव व त्यानुसार नाकारता येत नाही. अज्ञानी माणूस इंद्रियाच्या द्वारे आपली बुध्दी चालवतो. आणि जगातील घटनांचा अर्थ लावतो.संपूर्ण मानव जातीचा विचार केला तर त्यांच्या मनाची व इंद्रियांची रचना सारखीच असते. म्हणून प्रत्येकाचे ज्ञान अज्ञान सारखे चं असते. समयानुसार त्यात साधकबाधकता आणावी लागते.

# संतांचे होणे म्हणजे त्यांच्या आज्ञेत राहणे

आधुनिक केसरी

मी जिवंत राहावे हे जितके जरूर आहे, तितकेच परमात्म्याची ओळख करून घेणे जरूर आहे. जगात नावे ठेवीत नाहीत कोणाला ? परमार्थाला वाहून घेतले तर प्रपंच नीट करीत नाही म्हणून नावे ठेवतात; तिकडे लक्ष देऊ नये. मनाच्या विषादाला कारण एकच असावे की, मी अजून भगवंताचा झालो नाही. जो भगवंताच्या इच्छेने वागतो त्याचे चांगले होते. भगवंत ठेवील त्यात समाधान मानून राहावे. भगवंताचे रूप आनंदमय आहे, आणि सृष्टीचा क्रमच असा आहे की तो माणसाला आनंदाप्रत पोहोचवीत असतो. अत्यंत दरिद्र्यालासुद्धा आनंदाची जागा असतेच. आनंदाशिवाय मनुष्य जगणेसुद्धा शक्य नाही. मी मुळात आनंदरूप असताना मग दुःखाचे गाडे कुठून आले ? मला दुःख होते ते माझे कुठे तरी चुकते म्हणून ! मी चुकलो का बरोबर, ही शंकासुद्धा मुक्ताला येत नाही, कारण तो आणि देव एकच असतात. बद्धालाही शंका येत नाही. कारण तो देव जाणतच नाही; 'सर्व काही मी करतो, आणि देव नाहीच,' म्हणून म्हणतो. मुमुक्षूला मात्र ही तळमळ लागते.



जेव्हा ही तळमळ तीव्र असते तेव्हा संतांची भेट होते. काही पूर्वीचा ठेवा असल्याशिवाय अशी तळमळ लागणार नाही. आपण संतांचे होऊन राहावे. त्यांचे झालो म्हणजे त्यांच्याशिवाय आपल्याला कुणी नाही असे वाटले पाहिजे. संतांचे होणे म्हणजे त्यांच्या आज्ञेत वागणे. ते सांगतील तसे करावे, ते वागतील तसे नाही वागू. सत्याची संगत धरली म्हणजे सत्संगती मिळते. कशाचीही आसक्ती न धरता जगात वागणे हेच मुक्तांचे लक्षण. हवेपण नाहीसे झाले म्हणजे मग दुःखाचे कारणच राहात नाही. जिथे तुम्ही राहता तिथे सद्गुरू आहेतच असे तुम्हाला वाटते आणि समाधान होते, हीच त्यांची खरी कृपा होय. श्रद्धेने जे काम होते ते तपश्चर्येने होत नाही. आपल्या गुरूंनी सांगितल्याप्रमाणे वागणे हाच आपला परमार्थ समजा. गुरू म्हणजे साक्षात् परमात्मा. त्याची आज्ञा पाळणे हीच आपली तपश्चर्या. याहून वेगळे काही करण्याची गरज आहे असे न वाटावे. माझ्या मनाचे विकार जात नाहीत असे चांगल्या माणसांनासुद्धा वाटते. पण 'ते जात नाहीत, जात नाहीत' असे घोकून त्यांचा ध्यास घेतल्याने ते उलट वाढतील. तिकडे लक्ष देऊ नये. नाम घेणे हे आपले काम करीत राहावे, म्हणजे विकार आपोआपच कमी होत जातील. मात्र, मनाच्या मागे देहाला जाऊ न देणे, इतके जपले पाहिजे. आजचे बोधवचन आहे - ११५. संतांची आज्ञा प्रमाण मानणे हेच प्रचीती येण्याचे साधन आहे.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् । उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥ स्पष्टीकरण - हा आपला, हा परका असे म्हणून वागणुकीत पक्षपात करणे बरे नव्हे. तसे पाहिले तर सर्व जगच आपले आहे. पण तेवढी उडी सामान्य माणसांना झेपत नाही. पण सगळ्यांसाठी कष्ट करणे शक्य नसले, तरी आपले कुटुंब, आपले इष्टमित्र आणि आपले शेजारीपाजारी एवढयांच्या पुरते आपले तरी मन मोठे करायला हरकत असू नये. तुम्ही तुमचे मन मोठे केले तर तुम्हाला तुमचे कर्तव्यही आपोआप समजेल.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १७ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे...
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल
४९८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य
तात्काळ बँकिंग सुविधा
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू
कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

# जिल्हा उपनिबंधकच लाचलुचपत पथकाच्या गळाला

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**



**नाशिक :** जिल्हा उपनिबंधक सतीश खरे यांनाच तब्बल ३० लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले आहे. तक्रारदार हे नुकतेच नाशिक जिल्ह्यातील एका कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकांमध्ये संचालकपदी कायदेशीर व वैधपणे निवडून आले आहेत. त्यांचे निवडी विरुद्ध दाखल झालेल्या प्रकरणावर सुनावणी घेऊन ती सुनावणी तक्रारदार यांच्या बाजूने लावून निर्णय देण्यासाठी यातील आलोसे क्रमांक १ ) सतिश भाऊराव खरे, वय ५७ यांनी स्वतः तसेच ईलोसे खाजगी इसम क्र २ ) शैलेश सुमतीलाल सभद्रा वय ३२ यांनी तक्रारदार यांच्याकडे ३० लाख रुपये लाचेची मागणी करून सदर रक्कम आलोसे क्र १ ) यांनी स्विकारण्याचे मान्य करून त्यांचे राहते घरी तक्रारदार यांचे कडून तीस लाख रु.रोख लाचेची रक्कम ही पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले म्हणून त्यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीमती शर्मिष्ठा घारगे-वालावलकर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, नाशिक परीक्षेत्र,नाशिक, नारायण न्याहाळदे, अप्पर पोलीस अधीक्षक, आलोसे यांचे सक्षम प्राधिकारी मा.प्रधान सचिव, सहकार व पणन विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई, यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी अभिषेक पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक, सापळा पथक ए.एस.आय सुखदेव मुरकुटे, पो.ना. मनोज पाटील, पो.ना.अजय गरुड यांच्या पथकाने यशस्वी कार्यवाही केली.



# बेरळी- रिसनगाव- देऊळगाव - चितळी रस्त्याचे काम रखडले

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील मौजे बेरळी खुर्द येथून जाणारा रिसनगाव, देऊळगाव व चितळी हा रस्ता अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आ. श्यामसुंदर शिंदे यांच्या प्रयत्नातून हा रस्ता मंजूर होवून निधीही उपलब्ध झाला. कामाचे टेंडरही काढण्यात आणि कामाला सुरुवात करण्यात आली. परंतू गुत्तेदारांनी महसुल विभागाला चुना लावीत विना रायल्टी रस्त्यावर मुरूम टाकला. रस्ता उखडून ठेवला, काही दिवसांनी डांबरीकरण ते ही कच्च्या स्वरूपात केले यामुळे वाहनाच्या चाकांना गिट्टीचा मार लागत असून वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. बेरळी खुर्द येथे रस्ता उखडून टाकल्याने अपघात होत आहेत. गेल्या पंधरा दिवसापासून रस्त्याचे काम रखडले असल्याने नागरिकांसह वाहन चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सद्या लग्नसराई असल्यामुळे या मार्गावर नेहमीच वाहनांची मोठी वर्दळ आहे, परंतु रस्त्याचे काम रखडले, काही ठिकाणी रस्त्यावर गिट्टी टाकून ठेवली तर काही ठिकाणी रस्ता उखडून ठेवल्याने वाहनधारकांसह वऱ्हाडी मंडळींनाही याचा त्रास सहन करावा लागत आहे. वेळेवर काम होईल किंवा नाही याची शास्वती या भागातील नागरिकांना देता येत नाही. पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण झाले नाही तर वाहतुकीला मोठा त्रास सहन करावा लागणार आहे. या रस्त्याप्रमाणे मस्की फाटा ते देऊळगाव, चितळी रस्त्याचे कामही मंजूर करण्यात आले. कामाला सुरुवात झाली गुतेदाराने केवळ मुरूम रस्त्यावर टाकून गायब झाले आहेत. एक महिना झाला या रस्त्याचे काम बंद आहे. केवळ रस्त्यावर मुरूम टाकून गुतेदार गायब झाल्याने पावसाळ्यापूर्वी या रस्त्याचे मजबुतीकरण झाले नाही तर देऊळगाव ते चितळी रस्त्यावर चिखल होवून याचा त्रास देऊळगाव येथून चितळी येथे शाळेला जाणाऱ्या शाळकरी मुलांना सहन करावा लागणार आहे. तेव्हा याकडे संबंधित विभागाच्या वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी व लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन संबंधित विभागाच्या अभियंत्याला आदेशीत करून कामाला सुरुवात करावी व पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करावे अशी मागणी या भागातील जनतेतून होत आहे.

# मुख्यमंत्रीपदावरून काँग्रेस पक्षामध्ये रस्सीखेच

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** कर्नाटक विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून तीन दिवस उलटले आहेत. कर्नाटकात काँग्रेसला बहुमतापेक्षा अधिक जागा मिळाल्या आहेत. असे असले तरी पक्षाने अद्याप मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार घोषित केला नाही. मुख्यमंत्रीपदावरून कर्नाटकमधील वरिष्ठ नेत्यांमध्ये रस्सीखेच असल्याचे बोलले जात आहे. कर्नाटकचा मुख्यमंत्री निवडण्यासाठी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांकडून अनेक बैठका घेतल्या जात आहेत. काँग्रेसच्या या राजकीय हालचालींवरून भाजपाच्या आयटी सेल विभागाचे प्रमुख अमित मालवीय यांनी टोलेबाजी केली आहे. सर्कस बघायची आहे का ? कर्नाटकात काँग्रेसने आपला मुख्यमंत्री निवडला पाहा, असा उपरोधिक टोला मालवीय यांनी लगावला. त्यांनी ट्वीट करत ही टीका केला.

मालवीय ट्वीटमध्ये म्हणाले, भारतीय जनता पार्टीही आपला मुख्यमंत्री निवडण्यासाठी चर्चा आणि विचारविनिमय करते आणि सहजपणे मुख्यमंत्री निवडला जातो. सविस्तर सल्लामसलत करूनही भाजपाचे उमेदवार एकमेकांवर कधीही टीका करत नाहीत. किंवा समर्थकांना एकत्र आणणे आणि प्रसारमाध्यमांद्वारे पक्षाला गुप्त धमक्या देणे, हे भाजपात तुम्हाला कधीही दिसणार नाही. याउलट, काल सायंकाळी डीके शिवकुमार यांनी क्लॅरिजेस येथे पत्रकारांची बैठक आयोजित केली. तिथे उपस्थित असणाऱ्या पत्रकारांनी सिद्धरामय्या यांना कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणून जवळपास घोषित केले. काँग्रेसमधील ही स्थिती खेदजनक आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे स्वतः निर्णय घेणारे किंवा निर्णय घेणाऱ्या गटाचा एक भागही नाहीत, ते केवळ पोस्टमॅन म्हणून काम करताना दिसतात. ते नेहमी कोणत्या ना कोणत्या हायकमांडचा संदर्भ देतात, असा टोला मालवीय यांनी लगावला.

# गुरुद्वारा परिसरात मद्यपान; महिलेची गोळ्या झाडून हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**पटियाला :** येथे असलेल्या गुरुद्वारा परिसरात एका महिलेची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. ही महिला गुरुद्वारा परिसरात मद्यपान करत होती, त्यामुळे एका भक्ताने त्याच्याकडील परवाना असलेल्या पिस्तुलाने गोळ्या झाडल्या. याप्रकरणात एक स्वयंसेवकही जखमी झाला आहे.

निर्मलजीत सिंह असे गोळ्या झाडणाऱ्या व्यक्तीचे नाव असून त्याने पिस्तुलातून अनेक गोळ्या झाडल्या होत्या. यामुळे ४० वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. गुरुद्वारात महिला मद्यप्राशन करत असल्याने त्याच्या धार्मिक भावना दुखावल्या, अशी माहिती पोलीस अधिक्षक वरून शर्मा यांनी दिली. गुरुद्वारात उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांनी गोळ्या झाडणाऱ्याला ताब्यात घेतले आणि पोलिसांच्या हवाली केले. जखमी झालेला स्वयंसेवक सागर कुमार सध्या रुग्णालयात उपचार घेत असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येते. मृत झालेल्या महिलेचे नाव कुलविंदर कौर असून ती घटस्फोटित महिला होती. ती झिरकापूर येथे एका सलूनमध्ये कामाला होती. तिला दारूचे व्यसन होते. त्यामुळे व्यसन सुटण्यासाठी तिच्यावर उपचारही सुरू होते. सीसीटीव्ही फुटेजचा हवाला देत पोलीस म्हणाले की, ही महिला रविवारी रात्री एकटीच मंदिरात आली होती. तिला पूर्वीपासूनच दारुचे व्यसन होते. हा प्रकार रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडला. रात्री गुरुद्वाराच्या परिसरात असलेल्या तलावावर बसून ही महिला मद्यप्राशन करत होती.

# काँग्रेस प्रबळ तेथे पाठिंबा देऊ

आधुनिक केसरी न्यूज



**कोलकाता :** २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ज्या जागेवर काँग्रेसचे प्राबल्य असेल, त्या ठिकाणी तृणमूल काँग्रेसकडून काँग्रेसला पाठिंबा दिला जाईल, अशी भूमिका तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी मांडली.

देशात लोकसभा निवडणुकीसाठी विरोधकांच्या संभाव्य एकीची चर्चा सुरू झाल्यापासून प्रथमच ममता यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. येथील सचिवालयात पत्रकारांशी बोलताना ममता म्हणाल्या की, ज्या ज्या ठिकाणी काँग्रेस मजबूत आहे, त्या ठिकाणी आम्ही त्यांना पाठिंबा देऊ. पण त्याचवेळी त्यांनी ( काँग्रेसने ) अन्य राजकीय पक्षांनाही अशी मदत केली पाहिजे. त्यामुळे असा पाठिंबा मिळविण्यासाठी काँग्रेसनेही इतर पक्षांना अन्य ठिकाणी पाठिंबा देण्याची तयारी ठेवली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. ममता यांनी जागावाटपाबाबत त्यांना अपेक्षित असलेले धोरणही मांडले. ज्या-ज्या ठिकाणी प्रादेशिक पक्षांचे प्राबल्य आहे, त्या- त्या ठिकाणी जागावाटपाच्या सूत्रात त्या प्रादेशिक पक्षांना प्राधान्य मिळाले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. कर्नाटक विधानसभेचे निकाल जाहीर झाल्यानंतर तेथे भाजपला पराभूत केल्याबद्दल ममता यांनी तेथील मतदारांचे जाहीर आभार मानले होते, पण त्या वेळी त्यांनी काँग्रेसचे नाव घेणे टाळले होते. काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात अनेकदा राजकीय संघर्षांचे प्रसंग उद्भवले आहेत. ज्या ठिकाणी प्रादेशिक पक्ष प्रबळ आहेत, तेथे भाजप टिकू शकत नाही. विशिष्ट प्रांतात ज्या पक्षांचे वर्चस्व असेल त्यांनी तेथे एकत्रितपणे लढावे ( भाजपचा मुकाबला करावा ). मी जर काँग्रेसला कर्नाटकमध्ये पाठिंबा दिला, तर त्यांनी ( काँग्रेसने ) बंगालमध्ये माझ्याविरोधात लढू नये.

## १६-१६-१६ चा फॉर्म्युला

आधुनिक केसरी

देशाची आगामी लोकसभा निवडणूक अवघ्या एक वर्षावर येऊन ठेपली आहे. देशभरातले जवळपास सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. युत्या-आघाड्यांमध्ये जागावाटपाबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. सत्ताधारी भाजपाविरोधात विरोधी पक्ष एकजूट तयार करत आहेत. राज्यातही शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी आणि काँग्रेसने महाविकास आघाडी स्थापन करून भाजपासमोर आव्हान निर्माण केले आहे. त्यातच नुकत्याच झालेल्या कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला घवघवीत यश मिळाले आहे. त्यामुळे काँग्रेससह मित्रपक्षांचा आत्मविश्वास वाढला आहे. दरम्यान, महाविकास आघाडीच्या सातत्याने बैठका होत आहेत. आगामी रणनीती, महाविकास आघाडीच्या सभा आणि जागावाटपाबाबत यामध्ये चर्चा होत असल्याचे सांगितले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवारांच्या निवासस्थानी महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची महत्त्वाची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीला ठाकरे गटाकडून स्वतः पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत, राष्ट्रवादी काँग्रेसकडून शरद पवार, अजित पवार, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, काँग्रेसकडून नाना पटोले, भाई जगताप यांच्यासह अनेक मोठे उपस्थित होते. महाविकास आघाडीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत तिन्ही पक्षांनी आगामी लोकसभा निवडणुकीसाठी प्रत्येकी १६ जागा लढवाव्यात असा निर्णय झाल्याची चर्चा आहे. महाराष्ट्रात लोकसभेच्या एकूण ४८ जागा आहेत. ठाकरे गट १६, राष्ट्रवादी १६ आणि काँग्रेस १६ जागा लढवेल असं बोललं जात आहे. परंतु याबद्दल तिन्ही पक्षांच्या कोणताही नेत्याने याबाबत पुष्टी केली नाही. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अकोला दंगलीबाबत आज (१६ मे) सकाळी पत्रकार परिषद घेतली. यावेळी पटोले यांना महाविकास आघाडीच्या लोकसभेच्या फॉर्म्युलाबाबत थेट प्रश्न विचारण्यात आला. लोकसभेला महाविकास आघाडीचा १६-१६-१६ चा फॉर्म्युला ठरलाय का? असा प्रश्न पटोले यांना विचारल्यावर पटोले म्हणाले, याबाबत कुठलाही निर्णय झालेला नाही. प्राथमिक चर्चा झाली आहे. जागावाटपाचा मुद्दा अजून पुढे गेलेला नाही. दरम्यान, या बैठकीनंतर माध्यमांच्या प्रतिनिधींनी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना देखील महाविकास आघाडीने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटपाचा काय फॉर्म्युला ठरवला आहे असा प्रश्न विचारला. त्यावर जितेंद्र आव्हाड म्हणाले, मला काहीच माहिती नाही. त्या बैठकीत मी आंधळा, मुका आणि बहिरा होतो.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

## कर्नाटक निवडणुकीने भाजपच्या दक्षिण मिशनलाच धक्का!

आधुनिक केसरी

कर्नाटक विधानसभा निवडणुकीचे निकाल भारतीय जनता पक्षासाठी धक्क्यापेक्षा कमी नाहीत. या निकालांनी भाजपच्या दक्षिण मिशनलाच धक्का दिला नाही तर २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठीही या निकालांनी पक्षासमोर अडचणी निर्माण केल्या आहेत. कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पुन्हा सत्तेत परतली. भाजपच्या या निवडणुकीतील पराभवामुळे भविष्याची चिंता वाढली आहे. राज्यातील एकूण २२४ जागांपैकी काँग्रेसने १३६ जागा जिंकल्या आहेत, तर सत्ताधारी भाजपला केवळ ६५ जागांवर समाधान मानावे लागले आहे.



या निवडणुकीचे राजकीय महत्त्व केवळ कर्नाटकच्या राजकारणापुरते मर्यादित नसून २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या दृष्टिकोनातूनही हे महत्त्वाचे मानले जात आहे. अशा स्थितीत कर्नाटकच्या पराभवाने भाजपच्या मिशन-२०२४ साठीचा ताण वाढला आहे का? २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने ४०० जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या दृष्टिकोनातूनही कर्नाटकची निवडणूक भाजपसाठी महत्त्वाची मानली जात होती. अशा स्थितीत कर्नाटकात भाजप सत्तेबाहेर राहिल्याने पक्षाला आपले लक्ष्य गाठणे अवघडच नाही तर अशक्यही होऊ शकते. कर्नाटक निवडणूक ही २०२४ ची उपांत्य फेरी मानली जात होती. अशा स्थितीत पक्षाच्या पराभवामुळे भविष्याची चिंता वाढली आहे.

**कर्नाटकात जागा कमी होऊ शकतात**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस कर्नाटकात भाजपच्या जागा कमी करू शकतो. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत, राज्यातील २८ जागांपैकी भाजपने २५ जागा जिंकल्या आणि त्यांच्या समर्थित अपक्ष उमेदवारांनी एक जागा जिंकली तर काँग्रेस-जेडीएसला प्रत्येकी एक जागा मिळाली होती.

पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड, महाराष्ट्राबरोबरच कर्नाटकातूनही भाजपच्या जागा कमी होऊ शकतात. या राज्यांतील जागांचा तोटा भरून काढण्यासाठी भाजपला नवीन राज्ये शोधावी लागतील, जी शक्य नाही.

**पाच राज्यांमध्ये १७२ जागा**

विशेष म्हणजे २०१९च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने बंगालमध्ये ४२ पैकी १८, महाराष्ट्रात ४८ पैकी २३, कर्नाटकात २८ पैकी २५, बिहारमध्ये ४० पैकी १७, झारखंडमध्ये १४पैकी १२ जागा जिंकल्या. पाच राज्यांतील एकूण १७२ जागांपैकी भाजपने स्वबळावर ९८ जागा जिंकल्या, तर त्यांच्या मित्रपक्षांना ४२ जागा मिळाल्या. अशा प्रकारे १७२ पैकी १४९ जागांवर भाजप आघाडीने विजय मिळवला.

**भाजपचे समीकरण बिघडले**

महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलली आहेत. २०१९ मध्ये भाजपसोबत युती करून निवडणूक लढवणारी शिवसेना आता काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत महाविकास आघाडीत आहे. भाजपने एकनाथ शिंदे यांना साथ दिली मात्र मूड ऑफ नेशनच्या सर्वेक्षणात महाविकास आघाडीला ४८ पैकी ३४ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच बिहारमध्ये नितीश कुमार आता महाआघाडीत परतले आहेत, त्यामुळे बिहारमध्येही भाजपचे नुकसान होऊ शकते. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी तिसऱ्यांदा सत्तेवर आल्यानंतर भाजपचे समीकरण बिघडले असून त्यांचे सर्व नेते टीएमसीमध्ये सामील होत आहेत.

**मिशन-दक्षिणला धक्का**

दक्षिण आंध्र प्रदेश, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि तेलंगणामध्ये भाजपला अद्याप स्वतःची स्थापना करता आलेली नाही. दक्षिणेकडील सहा राज्यांमध्ये लोकसभेच्या १३९ जागा आहेत, ज्या एकूण लोकसभेच्या जागांपैकी सुमारे २५ टक्के आहेत. अशा परिस्थितीत दक्षिण भारत राजकीयदृष्ट्याही खूप महत्त्वाचा आहे. २०१९ मध्ये, कर्नाटक आणि तेलंगणामध्ये भाजपला जागा मिळाल्या, परंतु उर्वरित दक्षिणेकडील राज्यांमध्ये जागा मिळाल्या नाहीत. कर्नाटकच्या माध्यमातून भाजपला दक्षिणेत पाय पसरवायचे आहेत, पण कर्नाटकातच धक्का बसला तर तेलंगणा, आंध्र प्रदेशसह इतर दक्षिणेकडील राज्यांमध्ये मोठा राजकीय फटका बसू शकतो.

**अखिल भारतीय पक्षाला धक्का**

कर्नाटक विधानसभा निवडणुकीत भाजपचा पराभव झाला, तर दक्षिण भारतातून त्याचे पुनरागमन सुरू होऊ शकते. अशा स्थितीत अखिल भारतीय पक्ष असल्याचा दावा करणाऱ्या भाजपलाही कर्नाटकातील पराभवाचा फटका बसू शकतो. भाजपला स्वबळावर दक्षिणेतील राज्यांपैकी केवळ कर्नाटकातच आपली मुळे रोवता आली आहेत. कर्नाटक वगळता दक्षिणेकडील कोणत्याही राज्यात भाजपचा फारसा प्रभाव नाही.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

## शिक्षण क्षेत्रातील भीष्म पितामह

आधुनिक केसरी

डॉ. राम ताकवले यांच्या निधनाने शिक्षण क्षेत्रातील भीष्म पितामह गेले असेच म्हणावे लागेल. साठी सत्तरी ओलांडल्या नंतरही इतके कार्यरत राहणारे व्यक्तिमत्व दुर्मिळ. डॉ. ताकवले पंचे चाळीस वर्षे वयात पुणे विद्यापीठाचे कुलगुरू झाले. दोनदा हे पद मिळविण्याचा दुर्मिळ मान त्यांना मिळाला. नंतर ते नाशिकच्या मुक्त विद्यापीठाचे तसेच पुढे दिल्ली येथील केंद्रीय मुक्त विद्यापीठाचे देखील कुलगुरू झाले.आजन्म सातत्याने शिक्षण घेण्यासाठी मुक्त विद्यापीठाचे महत्व त्यांच्याच कार्याने अधोरेखित झाले. फिजिक्सचे प्राध्यापक या नात्याने त्यांचा वैज्ञानिक द्दष्टिकोन व्यवस्थापन क्षेत्रातही मोलाचा ठरला. ते द्दश्टे होते. भविष्याची निकड त्यांनी वेळीच ओळखली. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात संगणकाचे, इंटरनेट चे महत्व त्यांनी वेळीच ओळखले होते.

पुण्याच्या एम के सी एल शी त्यांचा स्थापने पासून संबंध होता.त्या माध्यमातून खेड्या पाड्यातील शाळा मध्ये संगणक साक्षरता रुजविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.मी कुलगुरू असताना आमच्या विद्यापीठात ते आले असताना त्यांनी संगणक काय काय करु शकतो यावर सुंदर विवेचन केले.पण त्यावेळी मुलांनी अध्ये मध्ये जो आरडा ओरडा केला तो माझ्यासाठी लज्जास्पद होता.पण त्यांचे मोठेपण असे की ते सारे त्यांनी खेळकर पणे स्वीकारले.भाषणानंतर त्यांनी माझ्या पाठीवर थोपटत डोन्ट वरी म्हंटले जे मी कधीच विसरणार नाही. त्यांचे प्रशासनातील योगदान, शिक्षण क्षेत्रातील योगदान,शालेय शिक्षणात संगणक, इंटरनेट यांचा चौफेर वापर करण्यासाठी राबविलेल्या प्रकल्पा संबंधी चे योगदान थक्क करणारे आहे.पण त्याची नव्या पिढीला म्हणा किंवा शासनाला म्हणा फारशी जाण असेल असे वाटत नाही.आजचे शासन,प्रशासन हे मिडियोकर मंडळी नी गजबजलेले आहे.त्यामुळे अशा अस्सल शिक्षण महर्षी कडे दुर्लक्ष झाल्यास मुळीच नवल नाही. आजकाल वेगळ्या शिक्षण सम्राटाचे राज्य आहे! भविष्याची गरज लक्षात घेऊन त्या प्रमाणे अभ्यासक्रमात वेळीच बदल गरजेचे आहेत हे या द्रष्ट्या व्यक्तीने वेळीच ओळखले.होऊ घातलेली उद्योगीक क्रांती, संगणक क्रांती,एव्हढेच नव्हे तर आताची कृत्रिम बुद्धिमत्तेची क्रांती या साऱ्यांचे महत्व त्यांनी दोन तीन दशकापूर्वी च जाणले.त्या दृष्टीने पावले उचलली.अगदी निवृत्त झाल्यानंतरही आधीच्या उत्साहाने त्यांनी नव्या योजना,नवे प्रकल्प राबवले.कार्यान्वित केले.

त्यांचा मृदू स्वभाव,चर्चा करतांना दुसऱ्याचे शांतपणे ऐकून घेण्याची,दुसऱ्याच्या मताला तितकेच महत्त्व देण्याचा उदार दृष्टिकोन हे सारेच लोभस होते. त्यांचे हसरे व्यक्तिमत्व, त्यांचा रुजू स्वभाव,यामुळे त्याच्याशी चर्चा करतांना ऊर्जेच्या स्रोत्रात न्हाऊन निघाल्याचे समाधान लाभत असे. माझी त्यांची दोन तीन दाच भेट झाली असेल.पण त्या अल्प सहवासात देखील खूप काही शिकायला मिळाले.ऊर्जा मिळाली. पुणे विद्यापीठ असो की मुक्त विद्यापीठ असो,दोन्ही संस्थांना नवी दिशा,नवे आयाम देण्याचे त्यांचे मोलाचे कार्य विसरता येणार नाही. अनेकासाठी कुलगुरू पद म्हणजे टाईमपास अशी मनोवृत्ती वाढत असताना डॉ ताकवले यांची पूर्ण पणे झोकूनदेऊन अखंड कार्यरत राहण्याची जिद्द आमच्या सारख्यांना प्रेरणा दायी ठरते.ज्यांना खऱ्या अर्थाने वर्षिप करावे,आदर्श म्हणून ज्यांच्या पुढे नत मस्तक व्हावे असे ते असली हीरो,असली गुरू होते.त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# पिंपळवाडी ते गिरडाघाटाचे काम निकृष्ट

## वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मिलीभगत करुन रोडचे तीनतेरा वाजविले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे हे गाव राज्यात भगवान चक्रधर स्वामी तिर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. दररोज हजारो भाविक भक्त सावळदबारा येथील चक्रधर स्वामी यांच्या दर्शनासाठी येतात आणि याच रस्त्याची पूर्ण वाट लागली आहे. देव्हारी, पिंपळवाडी मार्गे गिरडा घाटला व लालमातीकडे जोडला जानारा रोड या रोडाचे नित्कृष्ट दर्जाचे बोगस काम करुन ठेकेदार अशोक चव्हाण, इंजीनियर नितीन राठोड आणि सार्वजनिक बांधकाम फर्दापूर विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांनी मिलीभगत करुन रोडचे तीनतेरा वाजविले त्यामुळे त्यांचे लाईसन रद्द करुन योग्य ती लवकरात लवकर त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी या परिसरातील जनता मागणी करत आहे हा पुर्ण परीसर आदिवासी बहुलभाग असुन अनेक वर्षांपासुन हा रोड पुर्णपणे चाळणी चाळणी झालेला असुन रोडावरती मोठमोठे खड्डे पडुन पुर्ण खडी गिट्टी बाहेर निघुन पडलेली असल्यामुळे या परिसरामधुन भाविक भक्तांना प्रवास करताना प्रवाशांना स्वताचा जिव मुठीत धरुन तारावरची कसरत करत प्रवास करावा लागतो या रोडचे बोगस काम ठेकेदार अशोक चव्हाण ,आणि ,इंजीनियर राठोड यांनी पुर्ण काम मनमाणी करुन बोगस काम केलेले असल्यामुळे या रोडने अनेक अपघात .दुर्घटना होत असल्याचे ही नागरिकांकडुन सांगण्यात आले या परिसरातील जनता पुर्ण त्रस्त झालेली आहे मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजीनियर जाणूनबुजून झोपेच सोंग घेऊन नित्कृष्ट दर्जाचे काम करनारे ठेकेदार अशोक चव्हाण यांच्याशी मिलीभगत करुन नुस्ता बिल काढण्याचा सपाटा लावलेला आहे.नेमका यांच्या वर कोणाचा आशिर्वाद आहे. हाच प्रश्न वाहनधारकांना व प्रवाशांना पडला आहे. या कामाकडे नेहमी दुर्लक्ष करणाऱ्या बेजबाबदार ठेकेदार अशोक चव्हाण, इंजीनियर , नितीन राठोड आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ट अधीकारी यांच्यावरती लवकरात यांचे लाईसन्स रद्द करुन यांच्यावरती कारवाई करण्यात यावी अशी मागणी शासनाला प्रवाशी, वाहनधारक व नागरीक करीत आहे

# कार - दुचाकीच्या धडकेत एक ठार

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** खुलताबाद रोड वर भरधाव वेगाने कारच्या धडकेत एक जण ठार झाला, यात त्याचा जागीच मृत्यू झाला. भरत सुधाकर म्हस्के वय 37 रा. औरंगाबाद भावसिंग पुरा हा तरुण खुलताबाद - फुलंब्री रोडवरून दुचाकीने प्रवास करत होता.यात खुलताबाद रोडवरील देवगिरी साखर कारखाना परिसरात रस्त्यावरच असलेल्या दुभाजक असल्याने व अचानक समोर गाडी येत असल्याने दुचाकी धारक व कारधारकाने धडक दिल्याने हा भयंकर अपघात झाला. यात त्याचा मृत्यू झाला.

याबाबत फुलंब्री पोलीसांनी माहिती दिली की, शहरातील खुलताबाद रोडवरील देवगिरी साखर कारखाना परिसरात शनिवारी सकाळी 9 वाजेच्या दरम्यान कार क्रमांक एफ जी 5680 व दुचाकी क्रमांक एम एच 20 ए व्ही 660 ह्या दोन्ही वाहने धडकली .यात दुचाकी धारक भरत म्हस्के हा तरुण गंभीर जखमी झाला त्यात त्याला फुलंब्री च्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. यात संबंधित डॉक्टरांनी तपासून घेत त्यांना मृत घोषित केले.

या घटनेची नोंद फुलंब्री पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मनोज तुकाराम चिकटे युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस महामार्गावर रस्त्यावरच दुभाजक असल्याने अनेक निष्पाप लोकांचा बळी सा.बांधकाम अधिकारी याकडे दुर्लक्ष करत आहे. आणखी किती जणांचा बळी घेणार दुभाजक रस्त्याच्या मधोमध असलेल्या दुभाजक तोडता का आम्ही तोडु असा इशारा सागर गाडेकर, दीपक गाडेकर, राहुल गाडेकर, गणेश नागरे, रावसाहेब तांबे, शंकर कदम असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# छत्रपती संभाजी राजांच्या जन्मदिनानिमित्त आदर्श बचत गटाचे आदर्श कार्य

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील कळंब तालुक्यामधील भाटशिरपुरा गावातील जि.प प्राथमिक शाळा शैक्षणिक दृष्ट्या व शाळेच्या परिसरा बाबतीत जिल्ह्यात सुंदर शाळा अशी ओळख असणारी शाळा आहे. जिल्ह्यातील बहुतांश शासकीय शाळेमध्ये उन्हाळ्याच्या सुट्टीच्या काळात गावागावातील माथेफीरू तरुण गावातील व्यसनाधीन गृहस्थ उन्हाळ्यात किंवा शाळेच्या सुट्टीच्या दिवशी शाळा ही झोपण्यासाठी तसेच शाळेमध्ये धूम्रपान करणे, पत्त्याचा डाव खेळणे, शाळेच्या परिसरात लघुसंखेसाठी थांबणे अशा घटना जिल्ह्यातील अनेक गावागावात घडत असतात.

मात्र भाटशिरपुरा गावातील आदर्श बचत गटाच्या युवकांनी गावातील जिल्हा परिषद शाळेचे वैभव अबाधित राहण्यासाठी आदर्श उपक्रम राबवला आहे. शाळेच्या परिसरामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु नये,शाळेच्या परिसराचे वैभव कायम सुंदर राहण्यासाठी या आदर्श बचत गटाने जि.प शाळेला अतिशय उत्कृष्ट दर्जाचा सिसीटीव्ही कॅमेरा सेट भेट दिला आहे. "सुंदर शाळा,सुंदर परिसर" हे ब्रीद वाक्य कायम अबाधित ठेवण्यासाठी शाळेला सीसीटीव्ही कॅमेरा सेट भेट देत 24



तास शाळेवर करडी नजर ठेवण्याच काम आदर्श बचत गटातून करण्यात आलेले आहे.

दि-१४ मे २०२३रोजी छत्रपती संभाजीराजे जयंतीच्या निमित्ताने शाळेचे मुख्याध्यापक शाळेतील इतर कर्मचारी शिक्षक यांच्याकडे 24 हजार रकमेचा धनादेश सुपुर्द करण्यात आला. यावेळी सुर्यकांत खापे,प्रतिक गायकवाड ,रमेश रितपुरे जयसिंग राखुंडे ,अशोक गायकवाड,रमेश उळगे,अमोल सिरसट,गोपाल रितपुरे,विकास सिरसट,आरेफ मुलानी ,अंकुश गायकवाड हे सर्व गटाचे सदस्य उपस्थित होते.या आदर्श बचत गटाच्या उपक्रमाचे कौतुक जिल्हाभरातून सर्व स्तरावरून होत आहे.

# उमेदवारी न दिल्याने राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष पदाला सोडचिठ्ठी : बबनराव बनसोड

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक झाली त्यात मला डावलण्यात आले उमेदवारी दिली नाही. त्यामुळे आम्ही दुसरा पर्याय म्हणून कॉंग्रेस भाजप वंचीत आघाडी यांच्याबरोबर मी व युवती तालुका अध्यक्ष आम्ही त्यांच्या बरोबर जाऊन निवडणूक लढवली निवडणूक चालू असतांना माझ्या जागी आपण प्रभारी अध्यक्ष म्हणून दुसऱ्याची नियुक्ती केली.

पक्षामध्ये काही नियमावली आहे का नाही. माझं म्हणने न ऐकता दुसरी नियुक्ती करता येते का ? हे आपल्याला माहित नाही का ? सहकार मध्ये पक्षाच काही बंधन नसते ही निवडणूक पक्ष चिन्हावर नसते. जर बंधन असेल तर दीड वर्षापूर्वी जि. मध्यवर्ती बॅकेची निवडणूक झाली.त्या निवडणूकीमध्ये शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी एकत्र होवून निवडणूक लढवली. त्यामध्ये आ. सतिष चव्हाण निवडूण आले. नेत्याची निवडणूक असली म्हणजे भाजप चालते व कार्यकर्त्याची निवडणूक असेल तर बंधन घातल्या जाते. हा कोणता नियम आहे. त्यावेळेस भाजप बरोबर युती करुन निवडणूक का लढवली. त्यावेळेस का ? कारवाई केली नाही. पण माझा परावभव व्हावा या उद्देशाने आपण हे केले ठिक आहे. माझा पराभव झाला पण आम्ही दोन नंबरचे मतदान घेतले. तिकडे आजी आमदार मा. आमदार मा.नगरध्यक्ष यांचे पॅनल होते. . मी आदरणीय शरद पवार साहेंबाचे विचार अंगीकारुन पक्षात आलो. पक्षाने मला 2013 मध्ये पक्षाचे कन्नड सोयगांव मतदार संघाचे विधान सभा अध्यक्ष केले. त्यानंतर 2014 मध्ये विधानसभेची निवडणूक पक्षाने दिलेली जबाबदारी मी झोप वाढली मग माझ्यावर का अन्याय केला या सर्व बाबीला कंटाळून मी पक्षाचा राजीनामा उडतो करत आहे असे लेटर पॅडवर राजीनामा देण्यात आला आता राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बबनराव बनसोड कोणाच्या वाटेवर जाता याकडे सर्व तालुक्याचे लक्ष लागले आहे .


महाराष्ट्र Business Katta












# अंधार व प्रकाशातही रोशनाई: संत आशाताई!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**संत नेहमी जगाला प्रेमाचे दान करतात. स्वतः जळून मेणबत्तीप्रमाणे इतर मानवांना प्रकाश देतात. अंधार असो वा प्रकाश, दोन्ही परिस्थितीत ते प्रसन्न चित्ताने प्रकाशाचीच उधळण करित असतात. संतश्रेष्ठ आशाताई निकोडे या अशाच सेवाभावी संत होऊन गेल्या. पावन जयंती सप्ताहात त्यांचे गुणगौरव करणारी माहिती श्री एन. के. कुमार, से.नि.अध्यापक यांच्या शब्दशैलीतून उजागर करण्याचा हा छोटासा प्रयत्न...**

दुर्जन कोण, सज्जन कोण? सर्व मानवमात्रांशी सदवर्तनच घडले पाहिजे, असा अट्टाहास बाळगणाऱ्या संतश्रेष्ठ आशाताईने आपल्या आचरणातून जगाला दाखवून दिले. आग ओकणाऱ्या अग्नीवर पाणी न ओतता तिला शांत कसे काय करावे? याचे उत्तर फक्त संतांजवळच असते. म्हणूनच कवी म्हणतो-

**"आग लगी आकाश में,**
**झड़ झड़ गिरे अंगार।**
**सन्त ना होते जगत में,**
**तो जल मरता संसार।।"**

संतशिरोमणी आशाताई आपल्या गोड वाणीद्वारे मार्गदर्शन करताना म्हणत, की मनुष्य जन्म वारंवार मिळत नाही. आम्ही माणसाच्या पोटी जन्माला आलो तर माणसांशी प्रेमानेच बोललो पाहिजे. सर्वांशी गुण्यागोविंदाने वागून माणुसकी जपली तरच आपल्या जन्माचे- मानवी जीवनाचे खऱ्या अर्थाने सोने करू शकू-

**"तुला मानवा या ठायी, जन्म पुन्हा पुन्हा नाही!**
**बहु मोलाचे लाभले जीवन, माणसा तू माणूस बन!!**
**कर्मशून्य अर्थ त्या कथनीला नाही!**
**शोभेल का नाकच त्या नथनीला नाही!!**
**नाही कामाचे नुसते कथन, माणसा तू माणूस बन!!"**

संतश्रेष्ठ आशाताई आपल्या सहकारी महान परोपकारी भगिनींच्या बरोबर सेवा, सत्संग व सुमिरण यांत सदैव तत्पर असत. आपला प्रपंच नेटका व सुखमयी करता करताच त्यांनी परमार्थही प्राणपणाने प्रज्ज्वलित केला. संत्संगात त्या नेहमी गीत गात असत-

**"वदनी वदावी सदा अमृत वाणी।**
**जीवन बनवी देवा निर्मळ पाणी।।**
**देव पाहिल्यावर देवासारखे।**
**निर्मळ हे मन पाहिजे, हे जीवन पाहिजे।।"**

संतश्रेष्ठ आशाताईचा जन्म दि.१८ मे १९७१ रोजी गरीब शेतकरी संत तुळशीराम गुरनूले व संत पार्वताबाई या दांपत्याच्या कुटुंबात झाला. त्यांचे जन्मगाव विदर्भातील गडचिरोली जिल्ह्याच्या आरमोरी तालुक्यातील देलोडा बुजरूक हे होय. जन्मापासूनच त्या साध्या, सुहास्य वदन, प्रेमळ, संवेदनशील मनाच्या व सद्गुणी होत्या. त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण जन्मगावीच पूर्ण केले. उच्च प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी त्या इतर शाळकरी मुलींसोबत दररोज सुमारे ३ किमी अंतरावर असलेल्या वडधा येथील शाळेत पायी पायी जात असत. त्यांचा विवाह दि.७ जून १९९१ रोजी झाला. प्राथमिक शिक्षक व संतप्रवृती असलेले त्यांचे पती कृष्णकुमार निकोडे हे याच तालुक्यातील पिसेवडधा येथील रहिवासी पण नात्यातीलच होते. त्या काही काळ पतीसोबत नोकरीच्या गावी राहिल्या. तेथेही त्यांनी आपल्या प्रेमळ व सुस्वभावाची छाप पाडली. त्या नेहमी गुणगुणत असत-

**"सारी दुनिया का तूही करणधार है।**
**बिना तेरे ना किस को लगा पार है।।**
**फिर तो हम को फिकर कौन से बात की।**
**भूखे मरने की हो या तो खैरात की।**
**कहता तुकड्या यही मेरा निर्धार है।।"**



नंतर त्या प्रियंका व दुर्वांकूर या दोन मुलांच्या शिक्षणासाठी म्हणून पतीपासून दूर मध्यवर्ती अशा जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी मुलांसह राहू लागल्या. मुलांना त्यांनी आईबापाचे प्रेम देत वाढविले व सुसंस्कृत केले. स्त्रीपुरुषाची सर्व जबाबदारी त्या एकट्याच पार पाडत असत. पती पंधरा दिवस ते एकेक महिनापर्यंत घरी येत नसतानाही त्यांनी आपला प्रपंच नेटका ठेवला होता. संत आशाताई आध्यात्मिक विचार प्रवाहाशी सन १९९८ पासून समरस झाल्या. त्यांनी सत्य, एकेश्वरवादी, मानवतावादी असा पवित्र ब्रह्मज्ञान आत्मसात केले होते. ते पवित्र ब्रह्मज्ञान त्यांनी लाखांदूर जिल्हा भंडारा येथील ज्ञानप्रचारक महात्मा संतश्रेष्ठ पांडुरंगजी गुरनूले यांच्या करकमलांद्वारे प्राप्त केले. तेव्हापासून त्यांनी स्वतःला मानव सेवेत झोकून घेतले होते. शेजारीपाजारी, आप्त इष्टमंडळी यांच्याकडे किंवा धार्मिक- आध्यात्मिक सत्संग-संतसमागम अशा ठिकाणी होणाऱ्या सेवाकार्यात त्या स्वखुशीने सहभाग घेत असत. त्यात महाप्रसाद- भोजन स्वयंपाकातील तयारीची कामे, पाणी वाटप, झाडलोट व स्वच्छतेची कामे यात त्यांचा अवश्यच सहभाग असे. त्या सर्वांच्या मदतीला धावून जात, त्यांच्या सुखदुःखात त्या स्वकीयांसारख्या मिसळून जात असत. आपल्या प्रेमळ व मृदू वाणीने त्या इतर अनोळखी व्यक्तींनाही मंत्रमुग्ध करून मैत्री साधत असत. मानवमात्रांच्या सेवाशुश्रूषा कार्यासाठी आपल्या सहकारी भगिनी संत मीराबाई चोपकार यांच्यासोबत सर्वप्रथम नियोजित स्थळी उपस्थित होत असत. त्या तेथील सर्व सेवाकार्ये आटोपून सर्वात शेवटी ते स्थळ सोडत असत. मानवकल्याणाच्या कार्याला त्या प्रथम प्राधान्य देत असत. त्यांनी आपले आईवडील, भाऊबहिणी, जवळच्या नातलगांना तसेच मित्रमंडळींनाही आध्यात्मिक विचार धारेशी जुळवून आणले होते. त्या संत संगतीची महती पटवून देताना म्हणत-

**"संतांच्या संगती मिळते मनाला शांती!**
**येऊनी बसावे या संतांच्या पंगती!!**
**संत संगत धरा हो आला आहे मोका।"**

त्यांच्या माहेरची मंडळी ईश्वरभक्तीत तल्लीन होऊन परमात्म्याचे गुणगान गात सन्मार्गावर चालू लागले. अशाप्रकारे त्या ईश्वरीय ज्ञानाच्या प्रचार, प्रसार व सेवाकार्यातही खऱ्या उतरल्या. दारात आलेल्या याचकांना त्यांनी कधीच रिकाम्या हाताने जाऊ दिले नाही. त्या तहानलेल्यास पाणी, भुकेल्याला अन्न, गरजूंना धन-राशी, वस्त्रप्रावरणे आदी दानधर्म करत असत. म्हणतात ना,"जो आवडतो सर्वांना, तोचि आवडे देवाला!" या उक्तीप्रमाणे अशा महान संत आशाताई निकोडे यांनी कोरोना विषाणूचा संसर्ग जडल्याच्या कारणाने नश्वर देहाचा त्याग केला. त्या दि.६ एप्रिल २०२१ रोजी वयाच्या अवघ्या ४९व्या वर्षी ब्रह्मलीन झाल्या. एका कवीवर्यांनी म्हटलेच आहे- **"अशी पाखरे येती, स्मृती ठेवुनीया जाती!**
**दोन दिसाची रंगतसंगत, दोन दिसांची नाती!!"**

त्यांच्या अल्पवयात निघून जाण्याने गडचिरोली जिल्हा परिसरातील एक खरी सेवाभावी संत हरपल्याची खंत मनात कायम घर करून आहे, हे येथे उल्लेखनीयच!

**!! जयंती सप्ताहनिमित्त संतश्रेष्ठ आशाताईंना, त्यांच्या सेवाभावी तथा प्रेमळ स्वभावांना कोटी कोटी दंडवत प्रणाम !!**

# सनईचे सूर लपले अन् डीजेमुळे आजार वाढले...!



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**एकेकाळी लग्न समारंभात सनईच्या साह्याने वाजविले जाणारे अतिशय सुरेल असे सुर ऐकायला मिळत होते आणि आजही काही ठिकाणी मोजक्याच प्रमाणात ऐकायला मिळत असतात. पण,म्हणतात ना की,जुनं ते सोनं असतं तेच बरोबर होतं त्यापासून कोणालाही त्रास होत नव्हता उलट ते, कानावर पडताच मन अगदी प्रसन्न होऊन जात असे. त्याचप्रमाणे लग्न समारंभात असो, किंवा देवीचे विसर्जन करायचे असले की, ढोलक, झांज, बिजघंटा या प्रकारचे वाद्य वाजवले जायचे सोबत संताचे अभंग, भजन गाऊन नाचत, नाचत भक्तीत तल्लीन होऊन देवीचे विसर्जन करायचे बघताना असं वाटत होत की, हे सर्वजण वारकरी पांडुरंगाला भेटायला जात आहेत की, काय असच वाटत असायचे.**

त्याच प्रमाणे लग्न समारंभात सनईचे सुर ऐकायला मिळायचे तेव्हा, वाजविणाऱ्या त्या, कलावंताचे कौतुक करताना बघायला मिळायचे ते सर्व दृश्य, आठवणी खूप मागे गेलेल्या आहेत. ज्या, वस्तूंपासून कधी त्रास होत नव्हता तेच आजकाल लोकांना नको वाटत आहे आणि ज्या पासून दोन्हीही कान निका मी होत आहेत तेच हवेहवेसे वाटत आहेत खरच अशा व्यर्थ विचारसरणीला काय म्हणावे...? खऱ्या गोष्टींवर बोलले तर..कोणालाही राग येतो पण,हे सत्य आहे सनई किंवा जुने वाद्य हळूहळू लोप पावतांना दिसत आहेत जसे, जुने आचार विचार लोप पावतात त्याच प्रमाणे जुन्या वस्तूंची कोणी किंमत करत नाही. म्हणूनच जसे माणसाचे आचार, विचार बदलले त्या प्रमाणे नको, त्या गोष्टी हव्या वाटायला लागल्या आहेत. आज प्रत्येक कार्यक्रमात आपल्याला बघायला मिळत असते कोणी आपल्या परिस्थिती नुसार छान कार्यक्रमाचे आयोजन करतात मग ते लग्न समारंभ असो किंवा इतर कोणतेही कार्यक्रम असोत, त्या कार्यक्रमाची शोभा वाढविण्यासाठी व आनंद घेण्यासाठी सहकुटुंब उपस्थित असतात पण, त्या जागी सनई, बॅन्ड च्या ऐवजी डिजेला आमत्रण दिले जाते. मग बघाच डिजे वाजायला लागला की, बिनधास्तपणे नाचायला लागतात. प्रश्न इथे नाचण्याचा नाही तर...डिजेच्या वाढत्या आवाजावर आहे. डिजेचा जास्त आवाज वाढवतात आणि ह्याच अति आवाजामुळे अनेकांना धोका उद्भवत असतो या विषयावर मी धोडक्यात लिहीत आहे एका ठिकाणी लग्न होतं भरपूर पाहुणे जमले होते जेवणाच्या पंगतीला सुरूवात झाली होती ऐन त्याच वेळी, डिजे वाजायला लागला एवढा भारी आवाज होता की, तो आवाज ऐकून तेथे उपस्थित असलेल्या बहुसंख्य महिलांनी व पुरूषांनि कानाला झाकण्यासाठी रुमाल बांधले जसे हिवाळ्यात थंडी लागते ल बांधतात अगदी त्यासारखे ममी सुध्दा कापसाचे छोटे गोळे करुन कानात टाकली व वरतून रूमाल बांधली असे,चित्र कुठेतरी विचार करायला लावणारे आहेत.



कारण, डिजेच्या वाढत्या आवाजामुळे तेथे उपस्थित असलेल्या किती लोकांना त्रास सहन करावा लागतो याकडे मात्र कोणाचे लक्ष जात नाही. पुन्हा एक गोष्ट ती म्हणजेच गर्भवती महिला तिथे जर.. उपस्थित असेल तर.. तिचं काय व्हावं. ..? प्रत्येकांची प्रकृती एक सारखी नसते .मागे एकदा वृतपत्रात एक बातमी वाचण्यात आली होती कि,डिजेच्या आवाजामुळे नवरदेवाचा मृत्यू झाला होता, तसेच एका माणसाचे दोन्हीही कान निका मी झाले होते आपणच विचार करा या डिजेमुळे फायदा काहीच दिसत नाही उलट धोका जाणवताना दिसत आहे मग हे, नेमके डिजे कशाला. ..? हे,कोणाला कधी कळणार. ..? हा सुद्धा एक भारी मोठा प्रश्न आहे. म्हणून प्रत्येकांनी या होणाऱ्या धोक्यापासून व आजारापासून सावध रहाणे आवश्यक आहे. जुन्या काळात भलाही हे, वाद्य नव्हते पण कुठेतरी ते सुरक्षित होते आजच्या माणसाला सर्व काही कळताना सुद्धा स्वतः लाही त्रास करून घेत आहे सोबतच इतरांना ही त्रास देण्यासाठी उत्सुक आहे. तेवढेच पैसे गोर,गरीबांना दान केले तर.. वाया जाणार नाही. हे,सर्व कधी समजेल...?

# पालकांनी मुलांच्या मागण्यांवर सतर्क असलं पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जग आधुनिकतेच्या दिशेने धावतय रोज काही तरी नवीन बाजारात येतंय आधुनिक तंत्रज्ञान साधन सामुग्री ज्या पद्धतीने जाहिरात बाजी चालू आहे त्या अनुषंगाने प्रभाव निर्माण होणं हे क्रमप्राप्त आहे. आपल्या मित्र मैत्रिणी यांच्या कडे असणारी साधन आपल्या कड असावी अशी भावना मुलांच्या मनात निर्माण होणं स्वाभाविक आहे. प्रत्येक पालकाची परस्थिती सारखी नसते .मग ह्या बाबी सगळ्याच पालकांच्या दृष्टीने शक्य होणार नाहीत पण हे मुलांना लक्षात येत नाही . त्यांना आर्थिक स्थिती सोबत फार काही देणं घेणं नसतं.इतरांकड जे दिसत ते आपल्याकडं असावं हिच त्यांची अपेक्षा असते.**

मुळात विद्यार्थी दशेत अभ्यास हाच केंद्रबिंदू असला पाहिजे पण अभ्यास हा केंद्रबिंदू न रहता चंगळवाद फोफावत असल्याने अनुकरण संस्कृती रूढ होऊन मुलं त्या अनुषंगाने पालकांच्या कडे मागणी करतात. पालकांच्या दृष्टीने आपली मुलं हेच सर्वकाही असतं. मग मुलांनी आपल्याकडे केलेल्या मागण्या संदर्भात पालक म्हणून भावनिक असणं स्वाभाविक आहे. अथवा भावनिक अवस्थेत निर्णय घेणं सुद्धा स्वाभाविक आहे.पण मुलांना सुविधा पुरवताना पालकांनी नेहमी सचेत जागृत आणि सतर्क विवेकशील राहण्याची आवश्यकता आहे. भावनिक होऊन जर मुलांच्या चुकीच्या अयोग्य मागण्या आपण पूर्ण केल्या तर मग त्याचे चुकीचे परिणाम देखील येऊ शकतात. योग्य मागण्या भविष्य घडवतात तर अयोग्य मागण्या आयुष्य आणि भविष्य उध्वस्त होण्यासाठी कारणीभूत ठरतात. म्हणून मुलांच्या मागण्या बाबत पालकांनी सदैव विचारपूर्वक वागल पाहिजे. मुलांचं वय पाहता त्यांना भविष्याच आकलन नसतं तात्कालिन परस्थिती पाहुण अथवा आजुबाजुला असणार वातावरण तसंच संगती नुसार म्हणजेच कशाने तरी प्रभावित होऊन मुलं मागणी करत असतात . योग्य अयोग्य ची जाण मुलांना नसते . आपल्यासाठी काय योग्य काय आहे तसंच काय अयोग्य आहे समजण्याचा वय मुलांनच नसल्याने त्यांना त्या बदल फार गांभीर्या नसत . तसं पाहिलं तर त्यांचं ते समजण्याच वय पण नसतं. वातावरणाचा संगतीचा अथवा वेळेचा प्रभाव म्हणुन मुलांच्या दैनंदिन जीवनातील विविध मागण्या वेळोवेळी आपल्या समोर येत असतात. त्यामध्ये काही चुकीच्या मागण्यांचा समावेश असु शकतो. आपण जे योग्य आहे हितकारक आहे ते उपलब्ध करून दिलं पाहिजे आणि जे अयोग्य आहे. अहितकारक आहे ते अगदी गोडीने योग्य पद्धतीने समजावलं पाहिजे. ज्या मागण्या अमान्य करायच्या आहेत त्या मागण्या मुलांच्या लक्षात येणार नाही त्या पद्धतीने दुर्लक्षित करा. जोपर्यंत मुलं विद्यार्थी दशेत आहेत शिक्षणाचा महायज्ञ चालू आहे तोपर्यंत पालक म्हणून आपली जबाबदारी व कर्तव्ये पार पाडत असताना भावनिक कमी आणि विवेकशील जास्त आसल पाहिजे. आपला एक चुकीचा निर्णय मुलांचं भविष्य बिघडवु शकतो. शालेय जीवनात जे आवश्यक आहे ते उपलब्ध करून दिलं पाहिजे पण जे आवश्यक नाही अथवा हितकारक ठरणार नाही ते मागणी केली तरी उपलब्ध करून दिलं नाही पाहिजे. मुलांच्या चुकीच्या मागणीची पूर्तता आपण करत बसलो तर मग मात्र त्यांचं भविष्य आपणच बिघडवण्याचा शुभारंभ केला आहे. मुलांच्या उज्वल भविष्यासाठी पालक म्हणून आई वडील अहोरात्र धडपड करत असतात मुलांचं हित व्हावं ती घडवित त्यांचं आयुष्य चांगला व्हावं हिच सर्वसाधारण अपेक्षा असते. मुलं ज्या वेळी घडण्याच्या दिशेने असतात त्या वेळी पालक म्हणून आपण भावनिक नाहीं तर सजग असलं पाहिजे. मुलांच्या वेगवेगळ्या मागण्या या पैकी काय योग्य काय अयोग्य हे आपल्याला पण समजलं पाहिजे.



# संविधानाचे प्रास्ताविक



नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी

**भारताला स्वातंत्र्य मिळण्यासाठी 'ब्रिटिश' सरकारबरोबर दीर्घकाळ 'लढा' झाला आणि त्यांच्या बरोबर वाटाघाटींचे सत्रही सुरू राहीले. त्याच्याच एका टप्प्यावर 'ब्रिटिश सरकारने' पाठविलेल्या 'कॅबिनेट मिशनने' भारतात 'घटनात्मक राज्यपद्धती' आणण्यासाठी 'संविधानसभा' निवडण्याचा निर्णय घेतला. संविधान सभा:- आतापर्यंतच्या ब्रिटिशांनी भारतासंदर्भात पास केलेले विविध 'कायदे' आणि त्यांच्या अंमलबजावणीमुळे भारतामध्ये 'लोकशाहीची मुल्ये' अधिक चांगल्या प्रकारे रुजली होती. असे म्हटले जाते की, भारतामध्ये 'आधुनिकता' ही ब्रिटिश घेऊन आले आणि कालांतराने त्याचा परिणाम म्हणजे भारतात निर्माण झालेले 'आधुनिक संविधान'.**

३) देशाच्या नागरिकांना काय देणार ?:- आपण आपल्या देशाच्या सर्व नागरिकांना 'चार महत्त्वाच्या बाबी' देण्याचा संकल्प आपल्या संविधानाच्या प्रास्ताविकेत केलेला आहे. कोणत्या, ते जाणून घेऊया....


1) न्याय (Justice):- आपण आपल्या देशातील सर्व नागरिकांना कोणताही भेदभाव न करता एकूण तीन प्रकारचा न्याय देणार आहोत....

अ) सामाजिक न्याय (Social Justice):- आपल्या देशातील कुठल्याही नागरिकांसोबत धर्म, जात, वंश, लिंग या आधारांवर कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. सामाजिक न्याय म्हणजे शोषणविरहित, समताधिष्ठित, न्याय्य समाजाची निर्मिती होय.

ब) आर्थिक न्याय (Economic Justice):- आर्थिक न्यायाचा शब्दशः अर्थ आहे, आर्थिक क्षेत्रांमध्ये कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान न्याय प्रदान करणे. देशातील सर्व नागरिकांना आपल्या आवडीचे काम वा व्यवसाय म्हणजेच उपजीविकेचे साधन निवडण्याचा अधिकार असेल. सर्वांना समान कामासाठी समान वेतन मिळेल. याबाबत कोणत्याही आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव करता येणार नाही.

क) राजकीय न्याय (Political Justice):- राजकीय न्याय म्हणजे कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न होता जनतेची शासनात भागीदारी. ही भागीदारी देताना देशातील सर्व नागरिकांना कोणत्याही कारणाने उदा. जात, धर्म, वंश, लिंग या आधारावर भेदभाव न करता सर्वांना समान माणून समान संधी उपलब्ध करून देण्यात येईल. जनतेची 'मतदानाचा अधिकार' आणि 'सार्वजनिक पदांवर नियुक्ती' या दोन माध्यमातून शासनात भागीदारी होत असते.

2) स्वातंत्र्य(Liberty):- सर्व भारतीय नागरिकांना 'विचार(Thought)', 'अभिव्यक्ती(-Expression)', 'विश्वास(Belief)', 'श्रद्धा(Worship)' व 'उपासना(-Faith)' हे पाच प्रकारचे स्वातंत्र्य बहाल करण्याचा संकल्प आपल्या संविधानाच्या प्रास्ताविकेत करण्यात आलेला आहे. ह्या सर्व संकल्पना आपण 'अनुच्छेद-१९' जाणून घेतांना विस्ताराने समजून घेणारच आहोत.



भाग - ९

3) समानता (Equality):- प्रत्येक भारतीय नागरिकाला 'दर्जेची (Status)' आणि 'संधीची (Opportunity)' समानता देण्यात येईल. समाजामध्ये असणाऱ्या 'श्रेष्ठ-कनिष्ठ' भेदभावाला शासकीय पातळीवरून पुर्णपणे संपविण्यात आलेले आहे. शिवाय ते सामाजिक क्षेत्रातून देखील संपवण्यासाठी सामुहिक प्रयत्न गरजेचे आहे. तसेच शासकीय सेवेमध्ये नोकरीची संधी देतांना देखील कोणत्याही पात्र उमेदवारांना कोणत्याही आधारावर ती नाकारली जाणार नाही.

'अनुच्छेद-१४ ते १८ व ३९' मध्ये विस्ताराने समानतेच्या अधिकारांबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

4) बंधुता (Fraternity):- आपण सर्वजण एक समान असून, आपल्या देशातील सर्व लोकांमध्ये बंधुता वाढविण्यासाठी सर्वजण प्रयत्न करतील. आपल्या देशातील लोकांमधील बंधुत्वाच्या भावनेवर आघात करणाऱ्या सर्व बाबींना आपण सर्वजण मिळून संपविण्याचा संकल्प प्रास्ताविकेत करण्यात आलेला आहे. देशातील सर्व नागरिकांमध्ये निर्माण झालेली बंधुताच 'राष्ट्राची एकता' आणि 'एकात्मता' निर्माण होण्यास तथा टिकून ठेवण्यास कारणीभूत ठरेल.

अशाप्रकारे आपण न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या चार बाबी आपल्या देशातील सर्व नागरिकांना देण्याची 'खात्री' देण्याचे 'आश्वासन' आपल्या संविधानाच्या प्रास्ताविकेत दिलेले आहे. आता ही खात्री 'व्यक्तीची प्रतिष्ठा' व 'राष्ट्राची एकता' आणि 'एकात्मता' या दोन बाबींमध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड होणार नसेल, तेव्हा दिली जाऊ शकते. याबाबतीत कोणतीही तडजोड होणार नसल्याचा आपण प्रास्ताविकेत संकल्पपूर्वक निर्धार केलेला आहे.

आता हे संविधान आपणच बनविलेले असुन ते आपण आपल्यालाच 'अंगीकृत' आणि 'अधिनियमित' करून 'अर्पण' केलेले आहे. याचा अर्थ संविधानातील आशय हा केवळ 'राज्यपद्धती' पुरताच मर्यादित नसून, तो आपल्या 'जीवन पद्धतीत' देखील परावर्तित होईल. संविधानिक आदर्श व मूल्ये आपल्या रोजच्या आचरणातुन देखील दिसतील, असा संकल्प आपण प्रास्ताविकेच्या माध्यमातून केलेला आहे. आणि म्हणूनच आपले संविधान केवळ राज्यपद्धती म्हणुनच नव्हे, तर एक भारतीय म्हणून आपण ते जीवनपद्धती म्हणून स्विकारलेले आहे.

आपण हे संविधान '२६ नोव्हेंबर १९४९' रोजी स्वीकारल्याने '२६ नोव्हेंबर' हा दिवस आपण 'संविधान स्विकृत दिन' म्हणून साजरा करतो. भारतीय संविधानाची उद्देशिका ही जगातली सर्वश्रेष्ठ उद्देशिका मानले जाते. कारण इतकी 'सर्वसमावेशक' आणि प्रत्येक व्यक्तीचा मानवतावादी दृष्टिकोनातून 'एक व्यक्ती' म्हणून सर्वांगाने विचार करणारी, ही जगातली एकमेवाद्वितीय अशी राज्यघटनेची 'प्रास्ताविका' आहे. अगदी भविष्यात कधी काळी जर संपूर्ण जगासाठी एकच संविधान असावे, असा विश्वव्यापी विचार जगासमोर आला, तर जागतिक विचारवंत देखील जगातल्या सर्व राज्यघटनांचा अभ्यास करून, संपूर्ण जगासाठी केवळ आपल्याच राज्यघटनेची निवड करतील, असा माझा ठाम विश्वास आहे. एवढ्या व्यापक अर्थाने ती बनविण्यात आलेली आहे. आपण आपल्या संविधानाच्या केवळ प्रास्ताविकेवर जरी नजर टाकली, तरी माझा असा ठाम विश्वास का आहे, ते आपल्याला पटल्याशिवाय राहणार नाही.

"आम्ही, भारताचे लोक..." ही जी आपल्या प्रास्ताविकेची सुरुवात आहे, त्यात "भारताचे.." या शब्दाऐवजी "जगाचे.." हा शब्द बदलून, "आम्ही जगाचे लोक.." अशी जरी सुरुवात करून, आपले संविधान संपूर्ण जगासाठी लागू केले, तरी जगातली कोणतीही मानवतावादी, विवेकी व वैचारिक दृष्टिकोन असलेली व्यक्ती ते नाकारू शकणार नाही, याची मला पुर्ण खात्री आहे. आणि म्हणूनच 'भारतीय संविधान' हे जगातले सर्वश्रेष्ठ 'संविधान' असून त्याची असलेली 'उद्देशिका' ही जगातली 'सर्वश्रेष्ठ उद्देशिका' असल्याचे माझे ठाम मत आहे. आणि याचे सर्व श्रेय जाते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना. एवढी व्यापक आणि प्रचंड दूरदृष्टी असलेली जगतश्रेष्ठ राज्यघटना आम्हा सर्व भारतीयांना बहल केल्याबद्दल आपण सर्व भारतीयांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधान सभेच्या अन्य सर्व सदस्यांचे सदैव ऋणी राहीले पाहिजे.

# छत्रपती संभाजी महाराज धर्माचे नव्हे तर कर्माचे राजे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजी महाराज बहुजन समाजातील एक आदर्श व पराक्रमी राजा होते. छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या वडिलांचा समतेचा, बंधुतेचा व सामाजिक न्यायाचा, वारसा समोर चालवून अन्याय अत्याचाराला व अन्याय अत्याचार करणाऱ्याला हत्तीच्या पायदळी तुडवून सामाजिक न्याय जिवंत ठेवला. छत्रपती संभाजी महाराज हे जातीचे राजे नव्हते तर ते कर्माचे व मानवतेचे राजे होते. ही गोष्ट अगोदर आपणास समजून घेणे गरजेचे आहे. परंतु काही धर्मांध व नीच राजकारण करणाऱ्या लोकांनी संभाजी महाराजांना धार्मिक बनवून, त्यांचे कार्य मर्यादित करण्याचा प्रयत्न केला. परंतु छ. संभाजी महाराजांना मर्यादित करून त्यांचे कार्य कितीही लपवण्याचा प्रयत्न केला, तरीही संभाजी महाराजांच्या कार्य व त्यांची ख्याती कीर्ती आणि मानसन्मान हा कमी होणे शक्य नाही.**

संभाजी महाराजांबद्दल धर्मांध आणि राजकारणी लोक चुकीचा अपप्रचार करून त्यांना धर्मात बंद करत आहेत. एक साधी गोष्ट आहे जातीचा व धर्माच्या जोरावर गावातील माणूस सरपंचही होऊ शकत नाही. त्यालाही सर्वांना सोबत घेऊन चालावे लागते, तरच तो सरपंच होऊ शकतो. छत्रपती संभाजी महाराज तर राजे होते आणि राजाला जात धर्म नसतो, राजाची ओळख तर कर्मावरून होत असते. भारतामध्ये 560 पेक्षा जास्त संस्थाने अर्थात राजे असूनही आम्हाला मोजकेच राजे माहित आहेत. व त्यांचाच लोकशाहीमध्येही राजा म्हणून गौरव केला जातो. यावरून आम्ही ज्या राजांचा गौरव करतो तो त्यांच्या धर्मामुळे नव्हे तर त्यांच्या कर्मामुळे. आपण जेव्हा एखादी गोष्ट धर्मात किंवा जातील बंद करतो, तेव्हा त्याचे सार्वजनिक कार्य व विचार संपुष्टात येत असतात. आणि एका जातीच्या व धर्माच्या व्यक्तीला इतर जाती धर्मांच्या माणसांनी का मानावे हाही प्रश्न येतो. छत्रपती संभाजी महाराज समजून घेताना देशाचे व भेदभावाचे राजकारण करणाऱ्या नेत्यांना बाजूला सारून त्यांच्या मताचा विचार न करता संभाजी महाराजांच्या जीवनावरील बहुजन लेखकांनी लिहिलेले पुस्तके वाचणे अत्यंत आवश्यक आहे. तरच आम्हाला छत्रपती संभाजी महाराज व त्यांचे कार्य हे कळेल. छत्रपती संभाजी महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा समता, बंधुता व न्यायाचा वारसा समोर चालू ठेवला. कोणत्याही प्रकारचा भेदाभेद न करता 18 पगड जातीतील लोकांना एकत्र ठेवून मावळा हीच ओळख करून ठेवली. न्याय देताना जाती धर्माचा विचार न करता गुन्हा बघून गुन्हेगाराला शिक्षा दिली. छत्रपती संभाजी महाराज त्यांचे विचार व कार्य लोकशाहीतही टिकून आहेत. याचाच अर्थ त्यांचे कार्य व विचार लोकहिताचे, जनकल्याणाचे समतेची व न्यायाचे होते. परंतु त्याच संभाजी महाराजांच्या राज्यामध्ये, संभाजी महाराजांच्या नावावरती छत्रपती शिवाजी महाराज यांना धार्मिक बनवून मतांची झोळी भरली जाते. निवडून आलेले लोक छत्रपती संभाजी महाराज व शिवाजी महाराज यांच्या विचारांवर जनकल्याणाचे काम करत तर नाहीत, उलट न्यायदानाचे काम करताना जात, धर्म, राजकीय वशिला या बाबीचा ही विचार केला जातो. आणि त्याचमुळे ज्याच्या वरती अन्याय अत्याचार झाला अशा लोकांना न्याय मिळत नाही. उलट पक्षी अन्याय अत्याचार करणारे लोकांना जाती-धर्माच्या नावाखाली वाचवले जाते ही शोकांतिका आहे. जर आम्ही संभाजी महाराज योग्य पद्धतीने समजून घेतले असते तर त्यांना, जाती धर्मामध्ये बांधून राजकीय वापर केला नसता. तर संभाजी महाराजांची विचार व कार्य देशातच नव्हे तर जगभर पोचले असते. कारण छत्रपती संभाजी महाराज हे कधीही न हरणारे एकमेव पराक्रमी राजा होत. त्यांचा पराक्रम त्यांचा जनकल्याण या गोष्टीवरती कोणीच बोलत नाही. कोणत्या गोष्टी समजूनही घेत नाही. फक्त संभाजी महाराजांची हत्या औरंगजेबाने केली, त्याला धार्मिकतेशी सोडून देऊन समाजामध्ये द्वेष पसरवण्याचे काम येथील धर्मांध व स्वार्थी राजकारणी करत आहेत. परंतु संभाजी महाराजांची हत्या नेमकी मुस्लिमांच्या धर्मानुसार झाली की इतर धर्मानुसार? यावर मात्र चर्चा करायला कोणीही समोर येत नाही. जो कोणी सत्य सांगतो त्याला हे धर्मविरोधी म्हणून शिक्कामोर्तब करून मोकळे होतात. परंतु एखाद्याला अडवणे यापासून रोखणे म्हणजे सत्य उघड होणार नाही असे मुळीच नाही. छत्रपती संभाजी महाराजांसोबत अठरापगड जातीतील लोक होते, याचा अर्थ ते जनतेचे राजे होते. मग संभाजी महाराज समजून घेताना आपल्याला हे लक्षात घेणे आवश्यक आहे संभाजी महाराजांनी ज्या लोकांना हत्तीच्या पायाशी दिले होते तर ते लोक कोण होते? त्यांना हत्तीच्या पायाशी का दिले होते? याचा विचार करणे आवश्यक आहे. छत्रपती संभाजी महाराजांना मानतो म्हणजे फक्त त्यांच्या फोटोला मानने नव्हे, तर छत्रपती संभाजी महाराजांचे विचार स्वतः आत्मसात करून, त्यांच्या विचारांची पेरणी समाजामध्ये करणे, छत्रपती संभाजी महाराजांच्या स्वराज्यामध्ये सर्व जाती धर्माचे लोक आनंदाने नांदत होते. जर छत्रपती संभाजी महाराजांचा सन्मान करत असू, छत्रपती संभाजी महाराजांना मनापासून मानत असु तर आम्हाला छत्रपती संभाजी महाराजांच्या स्वराज्यामध्ये वावरताना समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय यावर आधारित विचाराची पेरणी करून, विषमता, भोंदूगिरी, पाखंडगिरी, याला मूठ माती देणे आवश्यक आहे. कोणत्याही चुकीच्या, काल्पनिक असलेल्या, सत्यता नसलेल्या गोष्टी यांचा संदर्भ धर्माशी जोडणे हे मानसिक गुलामाचे लक्षण होय. ज्या ठिकाणी विषमता, अंधश्रद्धा, पाखंड, भोंडगिरी या गोष्टी चालतात, आणि धर्माच्या नावाखाली या गोष्टीचे संवर्धन केले जाते. त्या ठिकाणी संभाजी महाराजांचे विचार व कार्य नसते. कारण छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर संत तुकाराम महाराजांचे वैचारिक व सामाजिक संस्कार होते. तुकाराम महाराज यांचे संस्कार असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणत्याही प्रकारची अंधश्रद्धा न पळता




कोणत्याही प्रकारचे पंचांग न पाहता आपल्या कार्याला सुरुवात केली होती. संभाजी महाराजांनी जीवनातील एकही लढाई हरले नाही. परंतु एकही लढाईला पंचांग पाहून ते गेले नाही. याचाच अर्थ आम्हाला थोतांड बाजूला सारून, भोंदूगिरी व अंधश्रद्धा बाजूला सारून, सत्य- विज्ञान व तर्क याचा आधार घेऊन छत्रपती संभाजी महाराजांची विचार स्वीकारणे आवश्यक आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचे कार्य व विचार एका लेखांमध्ये, एका पुस्तकामध्ये बंद करणे एवढे सोपे नाही. तरीही संभाजी महाराज यांच्या जीवनातील घडामोडी व त्यावेळेसची जीवनपद्धती, न्याय पद्धती, याचा तुलनात्मक अभ्यास करून त्या पद्धतीची व्यवस्था आज आहे का याचा प्रामाणिकपणे विचार करणे आणि तशी व्यवस्था नसेल तर तशी व्यवस्था निर्माण करून विषमता भोंदूगिरी अंधश्रद्धा पाखंड याला बाजूला सारणे, हे काम जर करत असो तरच आम्ही छत्रपती संभाजी महाराजांचे वैचारिक वारसा होत, व त्यांच्या विचाराचा त्यांच्या कार्याचा व त्यांचा मी सन्मान करतो हे तेव्हाच सिद्ध होईल. म्हणून त्यांच्या जिवनावर लिहणे आवश्यक आहे. छत्रपती संभाजी महाराज फक्त राजेच नव्हते तर एक कर्तबगार व्यक्ती, विद्वान, शिक्षण व साहित्याचे महत्त्व असलेले महान व्यक्ती होते. छत्रपती संभाजी महाराजांनी अगदी बालवयामध्ये चार ग्रंथ लिहिले. एकही ग्रंथ त्यांनी भाषांतरित केला नाही हे विशेष. छत्रपती संभाजी महाराज यांना मराठीसह सात भाषा अवगत होत्या, युद्ध कौशल्य हा तर त्यांचा जमेचा विषय होता. परंतु राज्यकारभार करताना योग्य ते निर्णय घेणे, कमी खर्चामध्ये योग्य असे काम त्यांनी केले, याचाच अर्थ छत्रपती संभाजी महाराज कुशल व्यवस्थापक सुद्धा होते. संभाजी महाराजांची ग्रंथ संपदा जर बघितली तर, त्यांनी स्वतः चार ग्रंथ 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ, तर 'नायिकाभेद', 'नखशीख' आणि 'सातसतक' हे ब्रज भाषेतले ग्रंथ लिहिले. स्वतःला छत्रपती संभाजी महाराजांचे मावळे समजत असाल आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर लिहिलेले अथवा संभाजी महाराजांनी लिहिलेले ग्रंथ जर आम्ही वाचत नसू तर छत्रपती संभाजी महाराज यांच्याशी वैचारिक व सामाजिक बेईमानी केल्यासारखे होईल. म्हणूनच संभाजी महाराजांना समजून घेताना संभाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आम्ही विद्वत्तेला महत्त्व देऊन, स्वतः विद्वान व्हायला सुरुवात करावी. संभाजी महाराजांना सात भाषा अवगत होत्या किमान आम्हाला एका भाषेत जे काही लिहिलेलं आहे ते सत्य स्वीकारण्याची तरी हिम्मत आमच्यामध्ये व्हायला पाहिजेत. आम्ही नाही ग्रंथ लिहू शकलो तरी चालेल परंतु संभाजी महाराजांनी लिहिलेले ग्रंथ आम्हाला वाचता व वाचवता आले पाहिजे. तरच आम्ही संभाजी महाराजांचे वैचारिक वारस व अनुयायी आहोत हे सांगण्यात अभिमान वाटेल.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त समस्त बहुजनवादी विज्ञानवादी व मावळा असल्याचा गर्व असणाऱ्या सर्व मानवांना मंगलमय सदिच्छा..

# चित्रपट गृह : एक अनामिक नातं

आधुनिक केसरी

**ये दौलत भी ले लो ये शोहरत भी ले लो भले छीन लो मुझ से मेरी जवानी मगर मुझ को लौटा दो बचपन का सावन वो काग़ज़ की कश्ती वो बारिश का पानी आजचा काळ खूप बदललेला काळ. इंटरनेट,मोबाईल ह्या सगळ्या सुविधांमुळे जग मुठीत नव्हे तर दोन बोटांवर येऊन विसावले आहे. जगाने आणि त्यातल्या त्यात आपल्या देशाने झपाट्याने प्रगती जरी केलेली असली तरीही,तसे म्हटले तर आमची पिढी अनेकार्थाने भाग्यशाली,कारण आमच्या पिढीने जे बालपण जगलं त्याच महत्त्व आताच्या पिढीला कळणारही नाही.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

ना आमच्या पालकांजवळ मुबलक पैसा होता,ना पॉकेट मनी ही संस्कृती होती. आपल्या पालकांचे पैसे वाचावेत म्हणून आमच्या एका वर्गाने समोर असलेल्या मित्रांच्या चौकटी आम्ही झिजवायचो. त्याची जुनी पुस्तके अर्ध्या किमतीत मिळावी म्हणून हे सगळं काही केल्या जायचं. तर संबंधित त्या मित्राचा मोठा भाऊ किंवा घरातील मोठा सदस्य ,पुस्तके खूप चांगली आहेत,फाटलेली नाही.आम्हाला ती पाऊण किमतीत विकायची असे म्हणायचे,त्यावेळी जीव कासावीस व्हायचा. आपले पालक एव्हडे पैसे देऊन पुस्तके घेतील की नाही याची खात्री नसायची. कॉन्व्हेंट संस्कृतीत शिकणाऱ्या आजच्या पिढीला आमची ती धडपड समजणे कदापिही शक्य नाही.

शालेय गणवेशासाठी 2,2 महिने सारखे रडावे लागायचे. पालकांनी कपडे घेतले की टेलर कडे ड्रेस शिवायला टाकल्या जायचा,टेलर जवळ 15-15 दिवस जाऊन बसायचं. त्याने देखील त्याची सगळी कामे आमच्या कडून करून घेणे, थोडक्यात 15 दिवस तो धोपटून घ्यायचा तेव्हा कुठे शिवून तयार झालेला गणवेश स्वातंत्र्य दिनाला घालून जायचा आनंद काही औरच होता. वर्ष- दीड वर्ष घालून झालेला पॅन्ट नंतर पुन्हा अलटर करून घालायचा, अशा पद्धतीने मोठी झालेली आमची पिढी. ना कुठले करमणुकीचे साधन ना खिशात खडकू. मनोरंजनाचे एकच साधन असायचे ते म्हणजे गावात येणारं फिरतं चित्रपट गृह अर्थात टुरिंग टॉकीज. मला आठवतं, माझे वडील बुलडाणा जिल्ह्यातील तेव्हाच्या मेहकर तालुक्यातील आणि आताच्या लोणार तालुक्यात असणाऱ्या सुल्तानपूर येथील श्री शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक. माझा जन्म सुल्तानपूरचाच. सुल्तानपूर येथे पावसाळा वगळता 6,7 महिने टॉकीज असायचीच.कधी एक तर कधी 2 अथवा तीन तीन टॉकीज. डिसेंबर महिन्यात रिसोड तालुक्यातील लोणी ( सखाराम महाराज ) येथील मराठवाड्याच्या सीमेवर असलेल्या गावी यात्रा भरायची.त्या यात्रेपूर्वी सिनेमा टॉकीज सुल्तानपूर ला यायच्या. राजकारण-समाजकारण आणि प्रशासन या तिन्हीही क्षेत्रात माझ्या बाबांचा आदरयुक्त दबदबा.अलीकडच्या सारखे आमदार- खासदार यांच्याशी कुणाचा थेट संबंध नसायचा किंवा हस्तक्षेप देखील नसायचा. माझ्या बाबांच्या सर्वत्र ओळखी असल्याने आणि चिखली येथील कासारे परिवार आणि आमचे कौटुंबिक सबंध. स्व. प्रभाकरराव कासारे, माजी आमदार जगाराव



चव्हाण आणि माझे बाबा हे वर्गमित्र.प्रभाकरराव कासारे ह्या परिवारास बाबांनी डोणगाव येथील हनवंतराव आखाडे यांची टुरिंग टॉकीज घेऊन दिली. आणि कासारे परिवाराने यात्रा करून त्यावर ह्या टॉकीज चे पैसे फेडत एका टॉकीजच्या अनेक टॉकीज उभ्या केल्या. त्यांच्या ह्या प्रगतीत बाबांचा सिंहाचा वाटा.त्यामुळे कासारे परिवार असो की दुसरे कुणी टॉकीज वाले ते जागेची, ग्रामपंचायतची, तहसील ची, अशा सगळ्या परवानगी साठी बाबांकडे यायचे. बाबा आलेल्या माणसाला चिठ्ठी लिहून देत भेटायला सांगायचे व त्या त्या टॉकीज च्या मॅनेजर ला परवानगी मिळून जायची. बाबांच्या संबंधामुळे सुल्तानपूर येथेच काय तर कुठल्याही यात्रेत कुठल्याच टॉकीज मध्ये सिनेमा साठी आम्हाला तिकीट काढायचे काम नसायचे. सिनेमाच फुकट असल्याने अनेक मित्र माझ्याशी सलगी करायचे अन मी देखील त्यांना माझ्या सोबत सिनेमा बघायला घेऊन जायचो. यात्रेत देखील संपूर्ण रात्रभर सिनेमा बघितला की या सिनेमाची स्टोरी,त्या सिनेमात घुसायची.कुठल्या सिनेमा चे काय कथानक आहे हे देखील आठवत नसायचं एव्हडी सरमिसळ झालेली असायची. टुरिंग टॉकीजशी हे असलं नातं असतांना मला मेहकर येथील प्रताप टॉकीज बद्दल सतत आकर्षण असायचं.

मेहकरशी संबंधित असलेल्या प्रत्येकाचं प्रताप टॉकीज शी एक वेगळं नातं होतं, हीच टॉकीज अलीकडे नेस्तनाबूत करण्यात आली. प्रताप टॉकीज जिथे दिमाखात उभी होती,त्या रिकाम्या जागेकडे बघितले की, हृदयात कालवाकालव झाल्या शिवाय आणि तोंडातून अरेरे हे शब्द निघाल्याशिवाय राहत नाही. तब्बल 11 वर्ष मेहकर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलेल्या माजी आमदार स्व ॲड.अण्णासाहेब देशमुख यांच्या मालकीची आणि त्यांच्या दूरदृष्टीचा कल्पना करायला लावणारी प्रताप टॉकीज म्हणजे केवळ मेहकर चे नव्हे तर एकेकाळी जिल्ह्याचे वैभव होते. जिल्ह्याचे वैभव असणारी प्रताप टॉकीज म्हणजे मेट्रो सिटी मध्ये ज्या पद्धतीने टॉकीज आहेत अगदी तशाच पद्धतीची बुलडाणा जिल्ह्यातील ही पहिली टॉकीज म्हटले तर ते चुकीचे होणार नाही बाल्कनी, प्रेक्षकांसाठी सुसज्ज मुत्रीघर, संडास,महिलांची स्वतंत्र आसन व्यवस्था,उत्कृष्ट बांधकाम ह्याचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून प्रताप टॉकीज कडे बघितल्या जायचे. मला कळत पण नव्हतं तेव्हापासून प्रताप टॉकीज म्हणजे माझ्यासाठी कायम आकर्षण असलेली आवडती टॉकीज. मी किती वर्षाचा असेल हे आठवत नाही. मात्र आई बाबांसोबत अकोल्यावरून किंवा कुठूनतरी मेहकर ला आलो. रात्र झाली, घरी सुल्ताणपूर ला जायला बस नसेल म्हणून कदाचित,पण आई आणि बाबासोबत काहीच कळत नसलेला लहान वयात असतांना आई बाबा सोबत प्रताप टॉकीज मध्ये कुठला तरी ब्लॅक अँड व्हाइट सिनेमा बघितल्याचे अस्पष्ट आठवते. त्या अजाणत्या वयापासून माझं प्रताप टॉकीज सोबत नातं जुळलं. आज मीच पन्नाशी ओलांडली आहे प्रताप टॉकीज चे वय असेल 65 पेक्षा अधिकचे जिल्ह्यात बुलढाणा, चिखली ,खामगाव ला देखील एव्हडी सुंदर टॉकीज नव्हती. नंतरच्या काळात माजीमंत्री माझ्या वडिलांचे मित्र स्व शिवाजीराव पाटील यांची मलकापूर येथील एक टॉकीज बांधल्या गेली व नंतर खामगाव ची,अलिकडे 1985 च्या दरम्यान लोणार ( सरोवर ) येथे किशोर मापारी यांची भागवत चित्र मंदिर उभी झाली, पण तरीही ह्या सगळ्या टॉकीज प्रताप टॉकीजच्या तुलनेत कमीच. तो काळ म्हणजे सिनेमा टॉकीज चा सुवर्ण काळ मेहकरच्या प्रताप टॉकीज मध्ये लागलेला सिनेमा बघण्यासाठी बैलगाडी ने खेड्यापाड्यातून लोकं यायची. दसऱ्याच्या दिवशी तर हमखास बैलगाडी,ट्रॅक्टर ने लोकं यायचे.

आम्ही सुल्ताणपूर ला असतांना त्यावेळी 7 वि , 8 विला सुल्ताणपूर येथील स्व. डॉ. आर. एन. लाहोटी यांचे चिरंजीव व आताचे शैक्षणिक तथा अनेक क्षेत्रातील मोठे व्यक्तिमत्व संजय लाहोटी हा मेहकरच्या एम ई एस हायस्कुल ला शिकायचा तो मेहकर वरून घरी आला की आम्ही त्याच्या घराजवळ त्याची आवर्जून वाट बघायचो ,येताना एसटी बस मधून सिनेमा ची पाटी बघायची,हे त्याला आवर्जून सांगितलेलं असायचं. तो आला की प्रताप टॉकीज मध्ये कुठला सिनेमा लागला ते सांगायचा आमच्या सर्वांच्या अगोदर आमचा बालमित्र संजय लाहोटी सिनेमा बघायचा मग आम्ही तहान भूक विसरून त्याच्या तोंडून सिनेमाची स्टोरी ऐकायचो तो एकटा बोलायचा आणि आम्ही कान देऊन सिनेमा चे कथानक ऐकायचो मग आमच्या टीम मध्ये अनेकवेळा नेतृत्व आमच्या पेक्षा वयाने व वर्गाने मोठा असलेला आमचा सुभाष दा,अर्थात मुख्याध्यापक सुभाष टकले सिनेमा ला जायचं ठरवायचा आणि आम्ही घरी रडून पडून पैसे व परवानगी मिळवायचो. मी आई बाबांसोबत बघितलेला कुठला तरी सिनेमा, सन 2000 ला लग्न झाल्यावर मित्राकडे त्याच्या घरी आलो,भाभींनी जेवून जा असा आग्रह धरला मग तो पर्यंत आम्ही सिनेमा बघून येतो असे सांगून माझ्या पत्नी सोबत 'कहो ना प्यार है' मुलांसोबत - परिवारासोबत 2006- 7 च्या दरम्यान विवाह हा सिनेमा बघितला त्यानंतर मात्र प्रताप टॉकीज मध्ये सिनेमा बघायला मिळाला नाही,नाही म्हणायला इतर खासगी कार्यक्रम बघितले. प्रताप टॉकीज च्या अनेकांना गोड आठवणी देखील असतील एखादी मैत्रीण सिनेमा बघायला आलेली असली की, सिनेमात शिट्या वाजवून संपूर्ण टॉकीज डोक्यावर घेणारे अनेक हिरो पडद्या समोर टॉकीज मध्ये बसलेले देखील बघितले. मात्र अनेक गोड आणि मधुर आठवणी प्रताप टॉकीज सोबत जुळलेल्या आहेत सुल्ताणपूर येथील आमचे मामा पंजाबराव पाटील यांच्या करडी गाळायला बैल गाडी जाणार होती,त्यांच्या कामावरील माणूस,त्यांचा मुलगा बाळू पाटील व मी बैलगाडीने केवळ सिनेमा बघायला गेलो पण चिंचोली च्या समोर बैलगाडी चे चाक तुटले, दुसऱ्याच्या बैलगाडी चे चाक बसवून आम्ही मेहकर ला गेलो,त्यावेळी रणधीर कपूर चा 'चाचा-भतीजा' हा सिनेमा बघितला 'चांदणी' हा सिनेमा कितीवेळा बघितला असेल सांगता येत नाही.

मेहकर ला 'राम तेरी गंगा मैली' हा सिनेमा प्रताप मध्ये आणि त्याचवेळी अमिताभ चा 'मर्द' हा सिनेमा राजा टॉकीज मध्ये लागलेला होता त्यावेळी यात्रेत देखील हे सिनेमे आलेले नसल्याने बुलढाणा येथून आमचे नातेवाईक हे 2 सिनेमे बघण्यासाठी मेहकर ला आले होते. कधी फर्स्ट,सेकंड क्लास चे पैसे नसतील तर थर्ड क्लास मध्ये देखील सिनेमा बघण्याचा अनुभव घेतलेला आहे त्यावेळी 2 रुपये तिकीट होते 1986 ला घरून शाळेसाठी यायचं व सिनेमा बघायचा हाच क्रम घाईत मेहकर ला यायचं,अमर म्युझिक सेंटर वर गाण्यांची यादि देऊन जुनी कॅसेट द्यायची व तोपर्यंत अमर म्युझिक सेंटर चे मालक श्री.छत्रे गाणे भरून ठेवायचे प्रताप टॉकीज उध्वस्त झाल्याने हे आठवणीच गाठोडं आपोआप सुटलं श्री.शिवाजी शाळेत असतांना एक घडलेला किस्सा... मी 1997 ला लोकमत चा महाविद्यालयीन प्रतिनिधी असतांना प्रसिद्ध केला होता. आमच्या वर्गात हिवरा साबळे येथील एक साबळे नावाचा मित्र होता.( आज तो ह्यात नाही ) त्याने आशिष चावला,मंदाकिनी चा चित्रपट बघितला होता. मधल्या सुट्टीत तो त्या सिनेमाची स्टोरी सांगताना त्यातील 'उषा आय लव्ह यु' असे त्याने फळ्यावर लिहले व ते खोडायचे तो विसरला. आमच्या वर्गात नुकतीच एकच मुलगी आली होती. तिचे नाव योगायोगाने उषा होते. तिने ते वाचले व रडायला लागली प्रा. सुरवसे सर क्लासवर आले. ती मुलगी का रडते हे सरांच्या लक्षात आले आम्ही 4,5 मित्र उडाणटप्पू,पण असला घाणेरडा प्रकार कधीच न केलेले.. सुरवसे सर जाम चिडले,मी ब्लॅक बोर्ड चा फोटो काढतो,पोलीस कम्प्लेंट करतो,खर सांगा कुणी लिहले असे विचारायला लागले. राजू टाले ( हे आता माझे सख्खे मावस सासरे आहेत ) , कलिम खान ( आताचा काँग्रेस चा जिल्हा सरचिटणीस ) ,विवेक तळणीकर, व मी अशा आम्हाला सरांनी बेंच वर उभे केले. मी वगळता हे सगळे क्रिकेट चे शौकीन, त्यादिवशी कुठली तरी मॅच होती. त्यांनी सांगितले सर भारताची मॅच होती आम्ही आलोच नव्हतो, सरांना ते पटले. आणि ते खरे होते. मग मला विचारलं मी लाजत लाजत सिनेमा ला गेलो होतो असे सांगितले व योगायोगाने आदल्या दिवशी चे सिनेमा चे तिकीट माझ्या खिशात होते मी पण सुटलो. नंतर एक साधा मुलगा,साबळे उभा राहला. सर, हे मी लिहले, पण आपल्या वर्गातील मुलीचे नाव उषा आहे हे मला माहिती पण नाही सर ( तिला वर्गात येऊन दुसराच दिवस होता,हजेरीत पण नाव नव्हते,दिवाळी पूर्वी खूप उशिरा वर्गात आली होती.) सर मी प्रताप टॉकीज मध्ये सिनेमा बघितला व ती स्टोरी मित्रांना सांगताना सहज फळ्यावर लिहून बसलो अस जेव्हा त्या साबळे ने सांगितले तेव्हा कुठे सुरवसे सर व ती मुलगी देखील शांत झाली. पण मला सिनेमाची खूप आवड आहे व मी शाळेला दांडि मारतो हे मित्रांना व शिक्षकांना देखील माहिती होतं अशा अनेक आठवणी ज्या प्रताप टॉकीज सोबत जुळलेल्या होत्या, आता त्या आठवणीचा 'गोडवा' गुलदस्त्यात बंद झाला आहे.

आधुनिक केसरी

# विश्वासू जोडीदारा'ची' निवड...

दिलीप नामदेव धायगुडे
मो. बा. ७७३८०३९१९५

योग्य वयात आल्यानंतर आई-वडिलांचं स्वप्न असतं की आपल्या मुलानं मुलींनं मोठं व्हावं, चांगलं शिकून एखादी चांगली सरकारी भरभक्कम पगाराची नोकरी त्यांना मिळावी. आयुष्यभर दुसऱ्याच्या शेतात किंवा एखाद्या राजवाड्यात, महालात भांडी, धुणे धुवून चार पैसे कमावून मुलांच्या शिक्षणाकरिता हातभार लावावा हा आई-वडिलांचा मानस असतो. सरकारी नोकरी जरी नाही मिळाली तरी एखाद्या खाजगी कंपनीत नोकरी लागली तर आमच्या आयुष्याचं फलित होऊन आमच्या डोळ्यासमोर अक्षदा पडल्या की आमच्या जीवनाचं सार्थक झाल्यासारखं नक्कीच वाटेल. लहानपणापासूनच म्हणा किंवा कोणी तरी शाळेत असल्यापासून प्रत्येक जण आपापल्या आवडीनिवडीनुसार किंवा मिळत्या जुळत्या स्वभावानुसार मित्र-मैत्रिणी बनत जातात. मग त्यांची एकमेकांची मने जुळली की, खाण्यापिण्यापासून मजा-मस्ती अभ्यास करण्यापर्यंत 'एक साथ हम टूटेंगे नही' अशी घट्ट मैत्री तयार होते. अशा या लहान, अल्लड वयामध्ये ना स्वार्थ, ना अहंकार याचा किंचितही स्पर्श न होता ही मैत्रीची मनं जुळली जातात ; परंतु खेळताना किंवा एखाद्या किरकोळ कारणांवरून वादविवादही होतात. एक दोन दिवस वातावरण एखाद्या आगीच्या भडक्यागत ज्वालामुखी झाल्यासारखं वातावरण तयार होतं. परंतु काही क्षणात ते शांतही होऊन पुन्हा सुरळीत नात्यांचा सहवास सुरू होतो. कोणत्याही नात्याला ना पैशाची किंमत मोजता येते ना एखाद्या वस्तूची! त्याला विश्वासाची आणि संयमाची झालर लावली की, बघणाऱ्यांसाठी ती शोभून दिसते. असं नातं तयार होऊन येणाऱ्या प्रत्येक संकटकालीन परिस्थितीला सावरण्याचं वावटळ तयार करतं. अशाच प्रकारचं मित्रत्वाचं नातं जेव्हा एक आपला श्रीकृष्ण - सुदामासारखा दोस्त, सखा, जिगरी बनवू शकतो तेव्हा आपलं योग्य वय झाल्यानंतर आई-वडील, नातेवाईक, सगे - सोयरे यांनाही वाटतं की आपल्या मुलानं चांगलं शिकून स्वतःच्या बळावर एखादी नोकरी मिळवली की, त्याला एक सुंदर अशी साजेशी, मनमिळावू छोकरी मिळावी. आपल्या मुलामुलींचे लग्न झाल्यानंतर आई-वडिलांच्या मनावरील भार एकदम कमी होऊन जातो. मुलांचा संसार सुरळीत चालू झाला की, त्यांनाही बरं वाटतं जसं म्हणतात ना की लग्न बंधनाच्या गाठी या स्वर्गातूनंच बांधल्या जातात, हे जरी मान्य नसेल तरीसुद्धा श्रद्धा ठेवून आपल्या विचारांना सकारात्मकतेचा मुलामा द्यावा लागतो. जेव्हा एखाद्या मुलाला किंवा मुलीला योग्य असा वर वधू पाहण्यासाठी मग धावपळ सुरू होते. कधी नातेवाईक तर कधी मित्रत्वाच्या नात्याने, ओळखीने स्थळ पाहण्याची वेळ येते तेव्हा त्या आई-वडिलांना पायातल्या चपला किती झिजवायला लागतात हा प्रश्न कधी त्यांना विचारलात का ? कोण गरीब घरातला तर कोणी श्रीमंत घरातला एखादा पक्ष असतो. काबाडकष्ट करून कोणी जमवलेली संपत्ती अथवा एखादा जमिनीचा लहानसा तुकडा विकून किंवा बलाढ्य धनवान घरातला असा एखादा अशा विवाहासाठी नोकरी करून जमवलेला पैसा असेल!

मुला मुलींच्या नावावरून, जन्मतारखेवरून, पत्रिका पाहून त्यांच्या सल्ल्याने विवाह मुहूर्त काढला जातो. थोडी जर नकारात्मकता दिसली तर तो विवाह जमण्यास अडथळा निर्माण होतो, मग पुन्हा विविध स्थळांची जोडणी होईपर्यंत धावपळ करावी लागते. जरी या दोघांची पत्रिका जुळली तरी नवरा, घरची परिस्थिती, वातावरण याचा सांघिकपणे विचार करून निर्णय घ्यावा लागतो. परंतु याला अपवाद आहे की मुलगा जर सुस्थितीत, सर्वगुणसंपन्न असेल तरीही बाह्य गुणांचा विचार करून निर्णय घेतला जातो हा झाला वर्ग एक. आणि दुसरा वर्ग असतो की, लव मॅरेज की यामध्ये कोणताही शास्त्रीय अभ्यास किंवा इतर वातावरणाचा विचार न करता घेतलेला एकाकी निर्णय यामध्ये फक्त दोघांनीच एकमेकांबद्दल ठेवलेली अस्था, प्रेम आणि घेतलेला निर्णय या विचाराने घडून गेलेली किंवा घडलेली घटना. या सर्वांचा जर विचार केला तर समाजमान्य निर्णय आणि एकाकी निर्णय यांच्या सहसंबंधातून एकच संयुग तयार होतं की जेव्हा एखाद्या मुलाचा किंवा मुलीचा विवाह जमविताना तो जोडीदार विश्वास, संयम, आपुलकीने श्रीमंत असावा. कारण विवाह झाल्यानंतरही वर्ष, दोन वर्ष, तर कधी सात वर्ष ही विवाह बंधनाची जोडी आनंदाने जीवन जगू शकते. परंतु नातेवाईक किंवा घरातीलच एखाद्या व्यक्तीच्या चुकीच्या शब्दांनं, किरकोळ शाब्दिक वादविवाद होतो. मग तो पती व पत्नी यांच्यातील अंतर तुटण्यासही तो वाद पुरेसा असतो. यामध्ये अपत्य असो वा नसो टोकाची भूमिका घेऊन कधी दोघांमध्ये फूट पाडणे, मग ती फुट घटस्फोटापर्यंत ही जाते. काही एखाद्या कुटुंबाकडे असलेली संपत्ती मिळेपर्यंत तात्पुरता सहसंबंध ठेवायचा मग जाणून बुजून त्रास, मारहाण यांचा चुकीचा विकल्प जोडून कोर्टाची पायरी चढायची आणि यातून अलगद बाहेर पडायचं, तर कोणी वासनेच्या आहारी जाऊन ठराविक मर्यादेपर्यंत थांबवून अचानक पळून जायचं.

अशा प्रकारच्या समीकरणांची दृश्य चित्रे आज दिसत आहेत. त्यामुळे सात जन्माची जोडी अखंडपणे आनंदी राहण्यासाठी, एकमेकांनी एकमेकांबद्दल विश्वास हा जोडीदारा'चा' प्रामाणिक राहीला तर कुटुंबातील व्यक्तींची मने जुळवण्यापासून ते करोडो रुपयांचा व्यवहार करताना कुटुंबातील सहविचार घेतला तर पश्चाताप या वेदनेलाही ब्रेक बसून अशी कितीतरी कुटुंबे चिरकाल एकसंधपणे आनंदी जीवन जगू शकतील.चला तर मग...

**"विचारांनं जीवन जगूया विश्वासाला साथ देऊया..!"**

# लोहा तालुक्यातील अवैध वृक्षतोड थांबवा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यात लाकूड तोडे व्यापारी, आरामशिन वाले व वनविभागाचे कर्मचारी यांची मिलीभगत दिसून येत असून वनविभागाचे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष होत आहे. तालुक्यात बेसुमार अवैध वृक्षतोड होत असून लाकडाने खचाखच भरलेले ट्रक्टर व इतर वाहने दिवसाढवळ्या राष्ट्रीय महामार्गावरून जात येत असल्याने अनेक वृक्षप्रेमीतून चिंता व्यक्त केली जात आहे.

वनकर्मचारी व आरामशिन वाले,लाकूड ताडणारे व्यापाऱ्यांची मिलिभत असल्याने अवैध वृक्षतोड होत असुन यांच्या आशिर्वादाने ही वृक्षतोड खुलेआम चालू आहे. व्यापारी शेतकऱ्यांचे कवडीमोल भावात झाडे घेत असल्याने शेतकरी कंगाल अन् वनकर्मचारी व व्यापारी मालामाल अशी अवस्था झाली आहे तसेच वन कर्मचारी यांनी वाळवंट बनविण्याचा जणू ठेकाच घेतला की काय ? असा संतप्त सवाल सुज्ञ नागरिकांकडून केला जात आहे. लोहा तालुक्या सारख्या ग्रामीण भागातील विविध जातीच्या वृक्षांची लाकूड व्यापारी बिनदिक्कतपणे वृक्षतोड करीत असल्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होत आहे. वृक्षतोड होत असल्याने नागरिकात संताप व्यक्त केला जात आहे. वन विभागाच्या वनरक्षकाची जबाबदारी असतानाही सदरील प्रकाराकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करत आहे. शासन एकीकडे 'झाडे लावा, झाडे जगवा' असा संदेश देत मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीवर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करत असून दुसरीकडे प्रशासकीय यंत्रणेच्या कामचुकारपणा मुळे सर्रासपणे वृक्षतोड होत असताना वनकर्मचारी मुग गिळून गप्प असून याकडे डोळेझाक करत आहेत. लाकूड व्यापारी आणि वनरक्षकाची या प्रकरणात मिलीभगत असल्याची चर्चा नागरिकातून ऐकायला मिळत आहे. सदरील गंभीर प्रकाराकडे वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन दोषींवर कठोर कारवाई करून तालुक्यातील होणारी अवैध वृक्षतोड थांबवावी अशी मागणी नागरिकांसह वृक्षप्रेमीतून होत आहे.







## मराठी पत्रकार परिषद पत्रकारांच्या पाठीशी कायम उभी राहणार

### जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके : आष्टीत मराठी पत्रकार परिषदेची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**आष्टी प्रतिनिधी :** मराठी पत्रकार परिषद ही पत्रकाराच्या विविध समस्या बाबत सोडविण्यासाठी कायम तत्पर पाठीशी राहणार असल्याचे प्रतिपादन बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी केले. ते मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या संदर्भात बीड जिल्हा दौऱ्या असून या अनुषंगाने आष्टी येथील शासकीय विश्रामगृहात सोमवारीआयोजित आढावा बैठकीत बोलताना केले. मराठी पत्रकार परिषद संलग्न आष्टी तालुका युवा पत्रकार संघ असून या अनुषंगाने आष्टी तालुक्यातील मराठी पत्रकार परिषदेचे सदस्य यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पत्रकार यांच्या विविध प्रश्नांबाबत चर्चा होऊन वर्षानुवर्षे प्रलंबीत असलेले विविध प्रश्न लवकरच सोडवले जातील असे आश्वासन बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी यावेळी बोलताना सांगितले.पुढे बोलताना ते म्हणाले की पत्रकार बांधवांनी परिषदेशी एक निष्ठपणे राहुन आपआपल्या कोणत्याही समस्या निःसंकोचपणे सांगा त्या परिषदेच्या माध्यमातून तत्पर सोडविण्यात येतील असे आश्वासन दिले. आणि येणाऱ्या बीड येथे विभागीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी या कार्यक्रमास आष्टी तालुक्यातील जास्तीत जास्त पत्रकार बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन आढावा बैठकीत साळुंके यांनी केले आहे.यावेळी बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष निसार शेख, जावेद पठाण, आण्णासाहेब साबळे, ॲड. किशोर निकाळजे, अक्षय विधाते, अतुल जवणे, गहिनीनाथ पाचबैल,दादासाहेब पवळ, संतोष नागरगोजे, समीर शेख, प्रेम पवळ, शहानवाज पठाण, संतोष तांगडे, अफसर पठाण, तुकाराम भवर,अमोल जगताप, अजिम ताश्कंद, विपुल सदाफुले, रंगनाथ काकडे, परमेश्वर घोडके आदी पत्रकार उपस्थित होते.

## सकल राजपूत समाज मेळावा यशस्वी केल्याबद्दल राज्यातील सर्वांचे आभार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** छत्रपती संभाजीनगर येथे रविवार( ता,१४ )रोजी आयोजित सकल राजपूत महामेळाव्यासाठी केंद्र सरकारचे संरक्षण मंत्री राजनाथसिंह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लोकप्रतिनिधी उपस्थित राहुन राजपूत समाजाच्या न्याय मागण्या मान्य करुन सहानुभूती दाखविली त्या बद्धल त्यांचे आभार तसेच राज्याच्या काना -कोपऱ्यातून सकल राजपूत समाजाचे बंधू-भगिनी व ईतर बांधव लाखोच्या सन्खेने उपस्थित राहिल्या बद्धल त्यांचे आभार, राज्यातील सर्व वर्तमान पत्र,इलेक्ट्रॉनिक मेडिया, सोशल मीडिया,पत्रकार,बातमीदार, व सर्व न्यूज चनल यांचे सकल राजपूत समाज अत्यंत ऋणी आहे. वैजापूर, शहर व तालुक्यातील सर्व सकल राजपूत समाज यांचे आभार, बुलढाणा, अहमदनगर, नाशिक, जळगाव, खामगाव जालना जिल्ह्यातून भरभरुन प्रतिसाद मिळाला.




## शेखपूरवाडी येथे समर्पण दिनानिमित्त सत्संग समारोह

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील शेखपुर वाडी येथे 13/05/2023 रोजी महाराज सुदिक्षा



माताजी महाराज यांच्या असीम कृपेने विशाल सत्संग संत निरंकारी मंडळाच्या वतीने आ. महात्मा हरिदास जी गिरी वाळूज छत्रपती संभाजी नगर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला बाजार सावंगी चे मुखी महात्मे सुपडोजी नलावडे यांनी आयोजन केले बाजार सांगी, गणोरी, शेरुडी, शेलगाव ,चौका, विटेकर वाडी, सांजूल ,बिल्डा ,चिंचोली ,शेलगाव, डोंगरगाव, वडोद ,धामणगाव, जेठे वस्ती ,सर्व पंचक्रोशीतील निरंकारी महात्मा बेहेनजी उपस्थित होते. सत्यसम्राट हृदयसम्राट बाबा हरदेव सिंहजी महाराज यांचा जन्म दि. २३ फेब्रुवारी १९५४ रोजी दिल्ली येथे झाला. सन १९७१ मध्ये त्यांनी निरंकारी सेवादलामध्ये प्राथमिक सदस्य म्हणून प्रवेश केला आणि सेवादलाची सुती खाकी वर्दी घालून सेवेचा आनंद लुटला. सन १९७५ मध्ये त्यांनी निरंकारी युथ फोरमची स्थापना केली. पा फोरमचे लक्ष्य होते साधे व सदाचारी जीवन जगणे, प्रेम व भक्तिपूर्ण सेवा अनावश्यक उधळपट्टीला आळा आणि नशाबंदी साधणे. दि. २४ एप्रिल १९८० रोजी कट्टरपंथी धर्मांधांनी मिशनचे तत्कालीन प्रमुख सद्गुरू बाबा गुरुबचन सिंहांवर निशाना साधून शहीद केले. तरुण बाबा हरदेवांनी शरीरातील सद्गुरु व पिताही गमावला होता. निरंकारी मिशनच्या प्रत्येक अनुयायाचे धैर्य, संगम आणि सहनशीलता पणाला लागावी असा तो क्षण होता. दि. २७ एप्रिल १९८० रोजी बाबा हरदेवसिंह जीना मिशनचे सांप्रत सद्गुरू व प्रमुख म्हणून घोषित करण्यात आले. शांती, प्रेम आणि विश्वबंधुत्व स्थापन करण्याचे आश्वासन कृतीत उतरविण्यासाठी बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी देश-विदेशांमध्ये विस्तृत प्रचार यात्रा आयोजित केल्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली संत निरंकारी मिशन मानवता, विश्वबंधुत्व, प्रेम, शांत समता, अहिंसा अशी महान ध्येये गाठणारी आध्यात्मिक बनून नावारुपाला आली आहे. सन २०१६ जून महिन्याच्या शेवटी होऊ घातलेल्या द्वितीय निरंकारी आंतरराष्ट्रीय संत समागमाच्या पूर्वतयारीची पाहणी करण्याच्या उद्देशाने ते कॅनडाच्या कल्याणावर असतानाच दि. १३ मे २०१६ रोजी त्यांची गाडी अपघातग्रस्त झाली आणि त्यातच मानवतेचे कार्य करत असतानाच त्यांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला.



## समाजनिर्मितीसाठी बुद्ध धम्माचा स्वीकार करा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे 'चलो बुध्द की ओर' धम्मदिक्षा अभियानाच्या माध्यमातून धम्मदिक्षितांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षतेस्थानी अभियानाचे प्रमुख श्रावणदादा गायकवाड हे होते. अध्यक्ष समारोप करतांना ते म्हणाले की, जातीचा अंत करुन समताधिष्ठीत समाज निर्मितीसाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय यावर आधारित मानवतावादी, विज्ञानवादी, वास्तववादी बुध्द धम्माचा स्विकार करुन बाबासाहेबांच्या विचारांचा भारत बौध्दमय करण्याचा संकल्प पूर्णत्वास न्यावा, असे आवाहनही शेवटी गायकवाड यांनी केले आहे. तसेच, १४ ऑक्टोंबर, २०२७ ला दीक्षाभूमी, नागपूर येथे १ लाख चर्मकार बांधवांना सामुहिक धम्मदीक्षा देण्याचा संकल्प जाहीर केला आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनिष नरवडे यांनी केले.
यावेळी भन्ते बुध्दशिल यांनी उपस्थितांना धम्मदेसना दिली तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. स. सो. खंडाळकर, मा. डी.एस. नरसिंगे, मा. भिमराव सरोदे, मा. अमरसिंह डाका, मोहनलाल गोरमे, प्रा. ग.ह. राठोड, श्रीमती संगिताताई भालेराव / जाधव यांनी आपले विचार मांडले. तसेच धम्मदिक्षितांच्या वतीने मेजर बाजीराव सोनवणे, हनुमंत कांबळे, सिध्दार्थ सुर्यवंशी, अभय चव्हाण, सुनिल सिरसाट, दिपक सोनवणे, गणेश डोंगरे, शिवराज कांबळे, सुभाष आदींनी प्रातिनिधिक स्वरुपात आपले विचार व्यक्त केले. या निमित्ताने धम्मदिक्षित बांधव व तसेच कार्यक्रमास उपस्थित उपासक, उपासिका यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'बुध्द आणि त्यांचा धम्म ग्रंथ देवून सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी सहा. पोलीस आयुक्त श्री बालाजी सोनटक्के भिमराव गव्हाळे, भास्कर लहाने, सुभाष बरोदे, संजय जाटवे, शांतीलाल लसगरे, मदन भगुरे, किसन फुलमाळी यांचा विशेष सत्कार करण्यात आला आहे.

अशोक गरुड यांनी आभार व्यक्त केले.
यावेळी प्रमुख उपस्थित म्हणून रामराव नरवडे, नानासाहेब शिंदे, किशोर गडकर, पवन पवार, संदीप अहिरे, मिलिंद मोकळे, उत्तम जाधव, शांतीलाल दाभाडे, नायबराव दाभाडे, मुकूंद दाभाडे, बाबासाहेब बोर्डे, भगवान तरटे, लाला बथाडे, प्रविण बोर्डे, मधुकर ठोंबरे, सुनिल अवचरमल, सुनिल खरात, गणेश साळवे, सुरेश खाडवे, हरिदास बोर्डे, अनिल भालेराव, रामकृष्ण देहरे, व्ही व्ही सपकाळ, आर. बी. बनसोडे, अभंग आर एस विशाल गवळे, कुणाल गायकवाड, संतोष ससाणे, मिलिंद बनसोडे, किशोर ससाणे, पप्पु लाहोटी, सुरेश कटारे, सी ए मगरे, गणेश सुलाने, सुनिल जाटवे, विर गुरुजी कडेठाणकर, सुनिल सावंत, लाला पुसे, एस बी पानगांवकर, अलंकार खंडागळे, अमोल जाधव, सचिन गायकवाड, शिवाजी घोगरे, रमेश खरात, सोमनाथ वाघमारे, भिमराव धाकडे, ॲड. एकनाथ रामटेके, सत्यजित गायकवाड, करुणाताई पाईकडे, ॲड. पुष्पा घोडके, करुणा पाटोळे, छाया मेश्राम, मंगलताई गायकवाड, शोभा कांबळे, मंदा म्हस्के, कलाबाई जाधव, सत्यभामाबाई अवचरमल, संध्या कोहली, संगीता पाटोळे, कमलबाई वाघमारे, कविता चौथमल, भारती बनकर, लिलाताई रामटेके, वंदना नरवडे, आम्रपाली दांडगे, सुनिता चव्हाण, उमा गौतम, शालिनी नरवडे, सुप्रिया सिरसाट आदींसह समाजबांधव मोठया संख्येने उपस्थित होते.



## असाही प्रामाणिकपणा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** रविवार रोजी जळगाव येथे कार्यरत असणारी मातृभूमी कमांडो फोर्सच्या कर्मचारी यांना ड्युटी ला जात असतांना डी. एस.पी.चौक जळगाव या ठिकाणी पर्स सापडले , त्यात पैसे व ओरिजनल पेनकार्ड , lic कागदपत्रे , एटीएम कार्ड , ड्रायव्हिंग लायसन , आधारकार्ड होते . मातृभूमी कमांडो फोर्सचे उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख व केशवस्मुर्ती प्रतिष्ठान समतोल प्रकल्पाचे व्यवस्थापक श्री. प्रदिप पाटील , व जळगाव कमांडो सिनियर अधिकारी दिपक महाले , कमांडो पुथ्वीराज सूर्यवंशी यांनी कुठला ही मोह न करता त्या कागदपत्रांची छाननी करून संपर्क नंबर शोधून पर्स हरविलेल्या व्यक्तीला फोन करून रामानंद नगर पोलीस स्टेशनला बोलवून घेत पोलीस कर्मचारी यांच्या साक्षीने पर्स पैसे सर्व कागदपत्रे त्यांना परत केले .
जळगाव येथील मातृभूमी कमांडो फोर्स चे जवान यांनी ज्यांचे पर्स हरविले होते त्यांचा संपर्क नंबर शोधून मनोज पाचपांडे असोदाकर यांचे पर्स , पैसे व सर्व कागदपत्रे परत केले. प्रदिप पाटील मातृभूमी कमांडो फोर्स चे उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख व आपदा मित्र आहेत यांच्या मार्गदर्शनाखाली दिपक महाले , पुथ्वीराज सूर्यवंशी जवान व आपदा मित्र हे ड्युट्या करीत असतात.ज्या ज्या वेळेस डिपार्टमेंट ला जवानांची कमी पडते , त्या त्या वेळेस mcf फोर्स चे जवान उभे राहून सेवा देण्याचे कार्य करीत आहेत. अनेक वेळेस त्यांनी हरविलेल्या वस्तू परत केलेल्या आहेत.

# पर्यावरणपूरक विकास काळाची गरज : कोंडे

आधुनिक केसरी न्यूज



**लातूर :** भारताला जी २० चे अध्यक्षपद मिळाल्यावर सरकारी आणि बिनसरकारी स्तरांवर शाश्वत विकास आणि पर्यावरण पुरकता याबद्दल बरीच चर्चासत्रे होत आहेत आणि मतमतांतर व्यक्त होत आहेत. ह्या दोनही गोष्टींची सांगड कशी घालता येईल, यावर शंकरराव भेलके महाविद्यालयात रा.से.यो. विभागातर्फे जी - २० पर्यावरण पूरक उपक्रम या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीपाद कोंडे ( अध्यक्ष माजी विद्यार्थी शंकरराव भेलके महाविद्यालय ) उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. आर.जी. सरोदे तसेच रा से यो. अधिकारी डॉ. जगदीश शेवते उपस्थित होते.
आपल्या भाषणात श्रीपाद कोंडे सर यांनी पर्यावरणाविषयी माहिती देताना सांगितले की, आपण राहत असलेला आजूबाजूचा भवताल, नैसर्गिक रमणिय ठिकाणे, जंगले, नद्या, पर्वत, समुद्र, वाळवंट आणि इतर संबंधित निसर्गातील घटक ह्यामध्ये प्राणी कीटक, पशुपक्षी ह्या घटकांचासुद्धा विचार व्हायला पाहिजे. त्याचे मुख्य कारण म्हणजे मानवाने निसर्गात बरीच ढवळाढवळ करून नैसर्गिक साधनांचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास केला आहे. त्यामुळे पर्यावरण बाधित झाले आहे आणि म्हणूनच पर्यावरणाचा नाश थांबून त्याचे रक्षण किंवा जतन करणे ही जबाबदारी मुख्यत्वे मानवावर आली आहे. आपल्या वर्तमानात बरोबर भविष्य देखील सुरक्षित ठेवण्याची नैतिक जबाबदारी आज आपली सर्वांची आहे. या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा. डी एस जाधवर यांनी केले, त्यांनी पर्यावरण आणि विकास यांचा समतोल कसा साधता येईल हे सांगताना , विकास म्हणजे काय ? याची उकल करून दिली. विशिष्ट कारणांसाठी उपलब्ध करून दिलेल्या अनेक विविध गरजा भागवणे, हे विकासाचे प्रमुख अंग म्हणता येईल. मानवी प्रवृत्तीचा विचार केला तर आधुनिक समाज व्यवस्थेत जास्तीत जास्त मूलभूत सुविधा तयार करणे म्हणजे विकासाच्या दिशेने वाटचाल होणे ही गोष्ट मानवाच्या मनात पक्की बसली आहे. त्याच्यासाठी प्रचंड प्रमाणात रेल्वे आणि रस्त्यांचे जाळे, पाण्यासाठी धरणे, मोठमोठाले नळ, तेल आणि गॅस पुरवठा वगैरेंचे नळ आणि इतर बरेच काही यात येते. त्यामुळे अर्थातच वीज-पाणी, राहण्याच्या जागा, अन्नधान्य म्हणजे अन्न, वस्त्र यांची उपलब्धता होते. त्यामुळे मानवी जीवन सुखी होते. पण हे सगळे घडवून आणताना पर्यावरणावर काय परिणाम होतात, याचा विचार करायला पाहिजे. पर्यावरण संतुलित ठेऊन विकास झाला पाहिजे त्यासाठी अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढला पाहिजे, आणि पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी मानवाने स्वतः पासून सुरूवात केली पाहिजे असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस जी घाडगे यांनी केले.

## अ. भा. मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदी प्रशांत दामले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची पंचवार्षिक निवडणूक एप्रिलमध्ये पार पडली. त्यानंतर अ.भा. मराठी नाट्य परिषदेच्या नियामक मंडळाच्या कार्यकारी समिती २०२३-२०२८ ची निवडणूक मंगळवारी पार पडली. या निवडणुकीत प्रशांत दामले यांची अध्यक्षपदी निवड झाली. तसेच उपाध्यक्षपदी ( प्रशासन ) नरेश गडेकर यांची, उपाध्यक्षपदी ( उपक्रम ) भाऊसाहेब भोईर यांची बिनविरोध निवड झाली, तर कोषाध्यक्षपदी सतीश लोटके यांची निवड झाली. अ.भा. मराठी नाट्य परिषदेच्या कार्यकारी समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीत कार्यवाहपदी अजित भुरे यांची निवड झाली असून सहकार्यवाहपदी समीर इंदुलकर, दिलीप कोरके आणि सुनील ढगे यांची निवड झाली आहे. अ. भा. मराठी नाट्य परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीत प्रशांत दामले यांच्या 'रंगकर्मी नाटक समूह' गटाने दणदणीत विजय मिळवला होता, त्याशिवाय कार्यकारी समिती सदस्यांमध्येही 'रंगकर्मी नाटक समुहातील' ११ जणांची निवड झाली आहे. यात सुशांत शेलार, गिरीश महाजन, विजय चौगुले, संदीप तेंडुलकर, दीपा क्षीरसागर, सविता मालपेकर, संदीप पाटील, विशाल शिंगाडे, विजयकुमार साळुंखे, संजय रहाटे, दीपक रेगेंचा समावेश आहे.



## मिरची कडाडली; चारशे तीस रुपये किलो

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** पावसाळ्याची बेगमी म्हणून घरोघरच्या गृहिणी आता लोणचे, तिखट, मसाले तयार करून ठेवण्याच्या कामाला लागल्या आहेत. मात्र, मिरची खरेदी नाकाला चांगलीच झोंबू लागली असल्याचे बाजारातील चित्र आहे.

किरकोळ बाजारात सर्वाधिक भाव चारशे तीस रुपये किलो पाटणा मिरचीस आहे. रंग, चव व डौलदार आकाराची ही मिरची चांगलीच कडाडली आहे. रेशीम पट्टा तीनशे तीस, भिवपुरी दोनशे वीस तर 'सी वन' अडीचशे रुपये प्रतिकिलो पडत आहे. अवकाळी पावसाने व नैसर्गिक आपत्तीने मोठ्या प्रमाणात मिरचीचे पीक उद्ध्वस्त झाल्याचे ऐकायला मिळाले. प्रामुख्याने परतवाडा, घाटंजी, भिवापूर, अर्जुनी मोरगाव, चिखलदरा हे मिरचीचे आगार समजल्या जातात. पण उत्पादन कमी व मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने गणित बिघडले. यामुळे आंध्र प्रदेश, तेलंगणा भागातून राज्यात मिरची येत असल्याचे सुप्रसिद्ध लोणचे विक्रेते अतुल केळकर यांनी सांगितले. आम्हाला लोणचे व मसाल्यांसाठी मोठ्या प्रमाणात वाळलेली लाल मिरची लागते. गेल्या तीन वर्षापासून या मिरचीचे भाव वाढत आहे. म्हणून ओल्या लाल मिरच्या विकत घेवून त्या वाळविणे व तिखट करण्याचा मार्ग स्वीकारला, असे केळकर नमूद करतात. पण मागणी वाढत असल्याने चढ्या भावातही घ्यावी लगत असल्याचे वास्तव त्यांनी सांगितले. भिवापूरचे मिरची उत्पादक नंदू पाचभाई हे सांगतात की, मिरची हे नाजूक पीक आहे. हवामान बिघडले की त्यास लगेच फटका बसतो. म्हणून लागवड क्षेत्र वाढत नसून मागणी मात्र सातत्याने वाढत आहे. मग मिरची महागणारच.

## लाच स्वीकारताना ग्रामसेवक चतुर्भुज

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** सात हजारांची लाज स्वीकारणाऱ्या ग्रामसेवकावर नांदेड प्रतिबंधक विभागाच्या पथकाने कारवाई केली ही कारवाई सोमवार दिनांक 15 जिंतूर पंचायत समिती समोरील एका हॉटेलमध्ये करण्यात आली ज्ञानेश्वर राठोड व 29 अशी कारवाई झालेल्या ग्रामसेवकाचे नाव आहे तो केहाळ येथे कार्यरत आहे. तालुक्यातील एका तक्रार करत्याला वडिलांच्या नावाने शासनाच्या आदिवासी समाजासाठी असणाऱ्या शबरी घरकुल योजनेअंतर्गत घरकुल प्रस्ताव मंजूर करण्यासाठी तसेच नमुना नंबर 8 चा उतारा घेण्यासाठी ग्रामसेवकांशी संपर्क साधला असता तेव्हा ग्रामसेवक राठोड यांनी तक्रारदारास 28 एप्रिल रोजी सात हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. यावर तक्रारदाराने लात लुजपत प्रतिबंधक विभागाला माहिती दिली होती. पथकाने पडताळणी केली असता लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

या आधारे सोमवारी पथकाने जिंतूरातील पंचायत समिती कार्यालया समोरील हॉटेल अमृत ज्यूस अँड नास्ता सेंटर जिंतूर येथे सापळा पथकाने पथकाने रंगेहात पकडले असून संबंधित ग्रामसेवकास सात हजार रुपयाची लाज स्वीकारताना पकडले या प्रकरणी पोलीस उपाधीक्षक किरण बिडवे, पोलीस निरीक्षक सदानंद वाघमारे, अतुल कदम ,शेख मुख्तार, शेख झेब्राहील चालक जनार्दन कदम यांच्या पथकाने ही कारवाई केली या प्रकरणात जिंतूर पोलीस ठाण्यात संध्याकाळी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## देऊळगाव गुजरी येथे कायम सुरू असलेल्या वरली मटक्याच्या धंद्यावर पोलिसांची बेधडक कारवाई

आधुनिक केसरी न्यूज



**जामनेर :** तालुकातील देऊळगाव गुजरी येथे कित्तेक दिवसापासून अनेक ठिकाणी वरली मटक्याचे धंदे सुरू आहेत अशी माहिती मिळताच पत्रकार कृष्णा पाटील यांनी बातमी घेण्यासाठी व्हिडिओ आणि फोटो घेत असताना सट्टयाचे मालकानी आपला पाळीव गावगुंड गोपाल तवर याला इशारा करून गावगुंडाने पत्रकारांशी अर्वाच्य भाषा वापरून पत्रकाराचा मोबाईल फोन हिसकावून घेतला व त्यांना धमकी दिली त्यानंतर पत्रकार कृष्णा पाटील यांनी पहूर पोलीस स्टेशनचे एपीआय इंगळे साहेब यांच्याशी संपर्क साधला त्यानंतर इंगळे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली फत्तेपूर येथील दुरुक्षेत्रात जाऊन पोलीस बीट अंमलदार किरण शिंपी यांच्याकडे घडलेला प्रकार व घटनाक्रम सांगितला त्यांनी लगेचच परमेश्वर भागवत जवरे, गोपाल साईदास तवर, शांताराम एकनाथ आवटे व रवींद्र रामचंद्र चव्हाण अशा चार जणांवर NCR दाखल करून भादवि कलम ५०४,५०६,आणि ३४ प्रमाणे असे गुन्हे दाखल करण्यात आले आहे त्यानंतर इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनच्या व पत्रकार संघटनेच्या वतीने पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून यापुढे कोणत्याही पत्रकारांना सामाजिक कार्य करत असताना अशाप्रकारे अडचणी निर्माण होऊ नये तसेच पत्रकारांच्या कामात अडचणी निर्माण करणाऱ्या गावगुंडांना पोलीस प्रशासनाने ताबडतोब आळा घालावा व यापुढेही होणारा त्रास कमी करावा अशी सुद्धा मागणी पत्रकार बांधवांनी निवेदनाच्या माध्यमातून पोलीस प्रशासनाला करण्यात आलेली आहे.



# ग्रामीण रुग्णालय ते तहसीलदार क्वार्टरपर्यंत स्ट्रीट लाइट लावा

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** शहरातील ग्रामीण रुग्णालय ते तहसीलदार क्वार्टरपर्यंत रस्त्याच्या दोन्ही ठिकाणी स्ट्रीट लाइट लावण्या ची मागणी बहुजन भूमिहीन संघर्ष मोर्चाचे तालुकाध्यक्ष वीरेंद्र वाघ यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे याबाबतचे निवेदन दि. 15 मे रोजी दिले आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, ग्रामीण रुग्णालय परिसरात रात्री अंधार असतो या ठिकाणी नेहमी अंधार असल्यामुळे येथे येणाऱ्या रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना त्रास होतो व अंधार असल्यामुळे याठिकाणी छोटे मोठे आपघात होऊ शकतात. तसेच ग्रामीण रुग्णालय परिसरात असलेले पोस्टमॉर्टम खोली जवळ देखील लाइट लावण्यात यावे अशी मागणी ही करण्यात आली आहे. यावेळी वाघ यांच्यासह उप सरपंच सुनील घुसळे यांनी मुख्याधिकाऱ्यांशी चर्चा केली व निवेदन दिला आहे.तर या निवेदनाची प्रतीलिपि आमदार प्रशांत बंब, भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, शहराध्यक्ष सतीश दांडेकर यांना ही दिली असल्याची माहिती वाघ यांनी दिली आहे.

# छत्रपती संभाजी महाराज जंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज



**माळीवाडा :** ग्रामपंचायत माळीवाडा येथे छत्रपती संभाजीमहाराज जंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी उपसरपंच कडू भाऊ कीर्तीकर ,पोलीस पाटील प्रमोद साठे ,ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी उपस्थित होते व गावकरी उपस्थित होते.



# लोणावला येथील ज्योतिष महाअधिवेशनात प्रकाश जांगिड सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पद्मावती आणि जस्टबुक ज्योतिष महाअधिवेशन लोनावला पुणे येथे ज्योतिष, वास्तुशास्त्र, हस्तरेखा महासम्मेलन नुकतेच घेण्यात आले आणि त्याचे प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षण मंत्री दीपक केसरकर तसेच अनिल वात्स, धर्मगुरु डॉ मानविन्दर रावत, दिनेश गुरुजी उज्जैन, सीमा देशमुख, प्रफुल कुलकर्णी, मोहन पूर्णपात्रे गुरुजी, किशोर जैन अंबाला, आचार्य चंद्रशेखर शास्त्री, अलकाजी, श्रीमती वर्धा अनिल वत्स,या महान ज्योतिषाचार्यांच्या उपस्थितीत प्रोग्राम संपन्न झाला आणि चेअरमन डॉ. सुब्बू जी यांच्याकडुन पुरस्कार/उपाधि देण्यात आली त्यात आचार्य ज्योतिषचार्य प्रकाश जगदीश प्रसाद जांगिड़ यांना ज्योतिविद् ही उपाधि देण्यात आली, या संमेलन मध्ये अनेक मान्यवर उपस्थित होते.



# चालकाच्या ताबा सुटल्याने कार खड्ड्यात पलटी

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** संभाजीनगर नांदेड राज्य महामार्गावरील पिंपरी गीते पाटील जवळ पुण्याहून जिंतूर कडे लग्नाला जाणारी होंडा वरणा कार क्रमांक एम एच 12 के टी 70 10 या कारचा चालकाच्या ताबा सुटल्याने सदर कार खड्ड्यात जाऊन पलटी झाल्याने प्रकाश उत्तम मोहिते राहणार रुई पिंपळा तालुका धारूर जिल्हा बीड हा जागी ठार झाला तर विकास विठ्ठल मोहिते नारायण आत्माराम पवार व नाथा लखुल पवार तिघे राहणार जुन्नर जिल्हा पुणे हे गंभीर जखमी झाले आहे याबाबत अधिक माहिती अशी की पुण्याहून जिंतूकडे लग्नाला जात असताना 15 मे सोमवारी दुपारी संभाजीनगर नांदेड महामार्गावरील गीते पाटीजवळ कारचा चालकाच्या ताबा सुटल्याने सदर कार खड्ड्यात जाऊन पलटी झाल्याने प्रकाश उत्तम मोहिते वय 32 वर्ष राहणार रुई पिंपळा तालुका धारूर जिल्हा बीड हा जागी ठार झाला तर कार मधील विकास विठ्ठल मोहिते नारायण आत्माराम पवार व नाथा लखुल पवार हे तिघे राहणार जुन्नर जिल्हा पुणे हे गंभीर जखमी झाले असून या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक विनोद साने सुधाकर वायाळ शेख जिलानी सुधाकर कु टे चालक वानरे आदींनी घटनास्थळी जाऊन भेट दिली व चारठाणा प्राथमिक आरोग्य केंद्रातून ॲम्बुलन्स बोलावली तात्काळ अंबुलन्स चालक शेख इसाकूद्दीन यांनी तात्काळ अंबूलस आणून त्या जखमीला बालाजी गीते नवनाथ पालवे यांनी तात्काळ अंबुलन्स मध्ये या जखमीला टाकण्यासाठी मदत केली.
विकास विठ्ठल मोहिते नाथा लखुल पवार व नारायण आत्माराम पवार यांना शासकीय रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले परंतु या तिघांची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे या तिघांना परभणी येथील शासकीय रुग्णालय येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

# युथ बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये ओम राजपुतला सुवर्णपदक तर तेजस देवरेला कांस्यपदक

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** नुकत्याच अकोला येथे १० मे ते १२ मे २०२३ दरम्यान पार पडलेल्या मुलांच्या महाराष्ट्र राज्य युथ बॉक्सिंग अजिंक्यपद चॅम्पियनशिपमध्ये धुळे जिल्हा बॉक्सिंग संघटनेचा बॉक्सिंग खेळाडू ओम राजपुत याने ६३.५- ६७ या वजनी गटात संपुर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले, त्याचबरोबर ९२+ या वजनी गटात तेजस देवरे याने कांस्यपदक पटकावले, कोरोना काळानंतर धुळे जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे पहिलेच सुवर्णपदक ठरले आहे, विशेष म्हणजे मोठ्या कालावधीनंतर ओम राजपुत ने सुवर्णपदक पटकावले, त्याचबरोबर त्याची सिक्कीम येथे १२ जून ते १८ जून दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय युथ बॉक्सिंग चॅम्पियनशिपसाठी निवड झाल्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक अभिनंदन, सरावात नियमित सातत्य,अभ्यासात उत्कृष्ट कामगिरी अशा दुहेरी भूमिकेत बॉक्सिंग खेळात आगामी काळात देशांसाठी खेळण्याचे स्वप्न उराशी बाळगून बॉक्सिंगचा कसून सराव करण्याकडे सध्या लक्ष केंद्रित करत असल्याने भविष्यात त्यांच्याकडुन सुवर्ण कामगिरीच्या अपेक्षा असतील,राष्ट्रीय युथ बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये महाराष्ट्रा राज्याचे ६३.५ - ६७ या वजनी गटात प्रतिनिधत्व करेल, राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत उत्तम कामगिरी धुळे जिल्ह्याच्या दोन्हीं खेळाडूंनी केल्याबद्दल धुळे जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष डॉ. तुषारजी रंधे, उपाध्यक्ष कैलास जैन, खजिनदार राजेंद्र बोरसे, सहसचिव डॉ. एल. के. प्रताळे, महासचिव मयूर बोरसे, विजेंद्र जाधव, भरत कोळी, ऋषिकेश अहिरे, धीरज पाटील, भूषण पवार आदींनी अभिनंदन केले.

# छत्रपती संभाजी महाराज जयंती दिल्लीत साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजी महाराज यांची पहिली वाहीली जयंती महोत्सव उत्साहात महाराष्ट्र सदन सभागृह दिल्ली तेथे १४ मे रोजी सायंकाळी साजरी करण्यात आली. या कार्यक्रर्माचे आयोजान छत्रपती संभाजी महाराज जयंती महोत्सव समिती २०२३ दिल्ली यांचे वतीने करण्यात आले होते. जयंतीच्या पूर्वसंध्येला भव्य असे दीपोत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थापक अध्यक्ष किशोरभाउ चव्हाण, अध्यक्ष विलासभाउ पांगारकर, कार्याध्यक्ष राजेंद्र दाते पाटील यांनी परिश्रम पुर्वक या जयंती महोत्सव कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

१४ मे रोजी सायंकाळी छत्रपती संभाजी महाराज यांची पहिली वाहीली जयंती दिल्लीत साजरी करताना लाखोजी जाधवराव यांचे वंशज शिवाजीराव जाधवराव, संस्थापक अध्यक्ष किशोरभाउ चव्हाण, अध्यक्ष विलासभाऊ पांगारकर, विजय काकडे, मराठा रामनारायण, कमलेश पाटील, मराठा रामनारायण, इंजि.तानाजी हुस्सेकर, विधीज्ञ राज पाटील, बडोदा घराण्याचे राजे शिर्के आदि प्रा.डॉ. राजाराम दमगीर पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून जयंती महोत्सवास सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण यांनी अनेक बाबी स्पष्ट करताना राजधानी दिल्लीत छत्रपती संभाजी महाराज यांची पहिली वाहीली जयंती साजरी करण्यामागची भुमिका विशद करताना आमच्या समितीच्या सततच्या पाठपुराव्या मुळे नुकतेच महाराष्ट्र शासनाने १४मे हा दिवस महापूरुषांच्या साजऱ्या करण्यात येणाऱ्या यादीत केल्यामुळे राज्य शासनाचे आभार व्यक्त करुन स्वराज्याची संकल्पना प्राणपणाने राबविणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांचा १४ मे हा जयंतीचा दिवस राष्ट्रीय स्तरावर साजरा करण्यासाठी केंद्र शासनाने अधिसूचना काढण्याची महत्वपूर्ण सूचना करून मराठा टुरिझम नावाने आगळे वेगळे शिवरायांचा भौगोलिक इतिहास जोडणारा प्रकल्प केन्द्र शासनाने हाती घ्यावा असे नमूद करून या पुढील काळात आठरा पगड जातींच्या इतिहासाचे योग्य ते संदेश जगा समोर जाण्यासाठी विशेष प्रयत्न केली गेली पाहिजे. विजय काकडे,मराठा रामनारायण,कमलेश पाटील, इंजी.तानाजी हुस्सेकर, विधीज्ञ राज पाटील आदींनी समयोचीत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलासभाऊ पांगार कर होते.आपल्या बहुमूल्य मार्गदर्शनपर भाषनात प्रमुख पाहुणे लाखोजी जाधवराव यांचे वंशज शिवाजीराव जाधवराव यांनी इतिहास कालीन अनेक पैलूंचा उलगडा करताना माँ जिजाउ साहेबाना चार भाउ असल्याचे नमुद करून जाधवराव कुटुंबातीलपहिल्या मुलीच्या जन्मानंतर हत्तीवरुन मिरवणुक काढून साखर वाटणारे पहिले आई बाबा ठरले. अध्यक्ष विलासभाऊ पांगारकर म्हणाले की, आमच्या समितीची वाटचाल प्रगत पद्धतीने होत असुन राष्ट्रीय स्तरावर छत्रपती संभाजी महाराज यांचे स्वराज्य निर्मितीचा अखंड तळपणारा दीपक देशभरातील शालेय स्तरावर पोहचावा म्हणून केंद्र शासनतर्फे सुध्दा विशेष उपक्रम राबविला गेला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करून छत्रपती संभाजी महाराज यांचा तळपता इतिहास देशातील प्रत्येक गावात पोहचला पाहिजे असेही ते म्हणाले. या प्रसंगी प्राख्यात वक्ते प्रा. प्रदीप साळुंके यांचे छत्रपती संभाजी महाराज जयंती महोत्सव समिती २०२३ दिल्लीच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांचे जयंती निमित्त व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते त्याप्रसंगी बोलताना प्राख्यात वक्ते प्रा. प्रदीप साळुंके यांनी छत्रपती संभाजी महाराज यांची जिवनी मांडताना छत्रपती संभाजी महाराज यांना नवव्या वर्षीच मिळालेली मनसबदारी, सोळाव्या वर्षी लिहलेले महत्वपुर्ण ग्रंथ आणि त्यातुन मांडलेली स्वराज्याची संकल्पना अत्यंत महत्त्वाची असून त्या मधुन प्राप्त संदेशच खरी एकात्मतेची हाक देणार असुन आठरा पगड जातींच्या मावळ्याना सोबत घेउन स्वराज्य रक्षणार्थ त्यांचे कार्य म्हणजे" स्वराज्याचे रक्षक " हे ब्रीद त्यांचें साठीच असल्याची बाब स्पष्ट होत असुन वयाच्या ३२व्या वर्षा पर्यंत स्वराज्य रक्षणाचे त्यांचें उत्तुंग कार्य नतमस्तक करायला लावणारे असुन स्वतःचे अतिउच्च ध्येय असल्या शिवाय प्रगती नाही म्हणून हातात शस्त्र घेणाऱ्या समाजाच्या व शेतकऱ्यांच्या हातात फाशी घेण्यासाठी दिसणारी दोरी व आत्महत्या व्यथित करतात असे मोठया धीर गंभीर भाषेत नमुद करतांना अनेकांच्या डोळ्यात पाणी आले होते.

मन हेलावून सोडणाऱ्या या व्याख्यानाचा समारोप आणि उपस्थितांचे आभार समितीचे उपाध्यक्ष प्रा. डॉ.राजाराम दमगीर पाटील यांनी व्यक्त केले.



# शेतकऱ्यांनी आधुनिक शेती तंत्राची कास धरावी

## कृषी सचिव एकनाथ डवले : अवघडराव सावंगी येथील कार्यशाळेत सीताफळ उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**जालना :** महाराष्ट्रासह मराठवाड्यात सीताफळ लागवड क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून अनेक शेतकरी याकडे आकर्षित होत आहेत.ही फळशेती फायदेशीर ठरत यातून कृषिक्षेत्रात मोठी उलाढाल होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होण्यास मदत होत आहे. म्हणून शेतकऱ्यांनी सीताफळ लागवडीचे नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून आधुनिक शेतीची कास धरावी असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी सीताफळ उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना केले. भोकरदन तालुक्यातील अवघडराव सावंगी येथे राजभवन फार्म आणि महाराष्ट्र राज्य सिताफळ महासंघ पुणे यांच्या वतीने सिताफळ उत्पादक शेतकरी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी कृषी सचिव एकनाथ डवले शेतकऱ्यांना संबोधित करत होते.यावेळी मंचावर महाराष्ट्र राज्य फलोत्पादन विभागाचे माजी संचालक श्री महलले, मेहकरचे निकस सर, अमरावती येथून बोथरा साहेब, रायपूर छत्तीसगडचे श्रीघोष व्हि. एन. आर., सीताफळ महासंघाचे अध्यक्ष श्याम गट्टाणी, सचिव अनिल बोंडे,उपाध्यक्ष एकनाथ आगे, जैन इरिगेशनचे शास्त्रज्ञ बि.डी.जडे, खरपुडी कृषी विज्ञान केंद्राचे प्राध्यापक कमल सर,गजानन भुते, कृष्णा भुते, हरिभाऊ भुते, भोकरदन तालुका कृषी अधिकारी रामेश्वर भुते,पत्रकार फकिरा देशमुख,शैलेश तळेकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डवले म्हणाले की महाराष्ट्रातील शेतकरी मोठ्या प्रमाणात फळ शेतीकडे वळल्याचे चित्र दिसत आहे. शासनस्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी जनजागृती केली जात आहे. यासाठी महाराष्ट्र शासन कृषी विभाग, विद्यापीठे, तसेच विज्ञान केंद्रे यामार्फत कार्यशाळा आयोजित करून जास्तीत जास्त फायदा शेतकऱ्यांना व्हावा हा त्यामागचा मुख्य उद्देश असल्याचे डवले म्हणाले. फळ उत्पादक प्रकल्पाचे संचालक व फळबाग उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधून समस्या जाणून घेतल्या.उन्हाची पर्वा न करता डवले यांनी थेट बांधावर जाऊन सीताफळ



छाटणी तंत्राची माहिती घेतली. त्याबद्दल हरिभाऊ भुते यांनी त्यांना सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांना फळबागांचे महत्त्व पटवून देण्यासाठी विविध ठिकाणी कृषी कार्यशाळाचे आयोजन करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.याचा फायदा घेत शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आधुनिक तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करावी असेही डवले म्हणाले. सदर कार्यक्रमात महाराष्ट्रासह इतर राज्यातील सिताफळ उत्पादक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राज्य सिताफळ उत्पादक संघ पदाधिकारी व शेतकऱ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेस शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ८० लक्ष रुपये रस्तेकामाचे आमदार फारूक शाह यांच्या हस्ते उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाआभियान अंतर्गत प्र.क्रं.१९मध्ये १०० फुटी, शब्बीर नगर व २०००वस्ती परिसरात कॉंक्रिट रस्ता तयार करण्यासाठी शब्बीर नगर ते शालिमार हॉल,शाहिद बर्तनवाले ते ३५ खोलीपावेतो रस्ता कॉंक्रिट करणे कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या शुभहस्ते संपन्न करण्यात आले. शहरातील अल्पसंख्याक भागात मुलभूत सुविधा जसे रस्ते,गटारी, पाण्याची पाईप लाईन यासाठी आजपर्यंत लोक प्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्यामुळे या भागाचा विकास थांबलेला होता. कॉलनी व वस्त्यांमध्ये रस्ते नसल्यामुळे पावसाळ्यात नागरीकांचे हाल होत होते. त्या सगळ्या गोष्टींचा आमदार फारुख शाह यांनी अभ्यास करून ज्या भागात रस्ते नाही. गटारी नाही ,पाईप लाईन नाही. यासाठी निधी उपलब्ध करून कामाचा सपाटा लावलेला आहे. आ. फारुख शाह यांनी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाआभियानअंतर्गत प्र.क्रं.१९मध्ये १०० फुटी,शब्बीर नगर व २०००वस्ती परिसरात कॉंक्रिट रस्ता तयार करणे.शब्बीर नगर ते शालिमार हॉल,शाहिद बर्तनवाले ते ३५ खोलीपावेतो रस्ता कॉंक्रिट करण या कामासाठी ८० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. त्याचे आज आ.फारुख शाह यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमास त नगरसेवक आमिर पठाण, प्यारेलाल पिंजारी, मौलाना शकील, निजाम सय्यद, कैसर अहमद, इकबाल शाह,रफिक शाह पठाण, माजीद पठाण, हलीम शमसुद्दिन, माजीद काझी,आसिफ शाह, रईस शाह, इंजि. अफसर शाह, शहजाद मिर्झा, अजहर सैय्यद, मुकतार शेख, मुनाफ शेख,अफजल शेख, अमीन शेख,सत्तार शेख, सलमान शेख, महेमुद शेख, सरफराज अन्सारी,रफिक खाटीकरस्त्याचे काम सुरू झाले.

# वैजापूर तहसीलवर जनशक्ती शेतकरी सघटनेचे धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** जनशक्ती शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय अतुल भाऊ खुपसे पाटील याच्याआदेशानुसार छ संभाजीनगर व नाशिक जिल्हा संपर्क प्रमुख अनिल शेळके पाटील याच्या प्रमुख उपस्थितीत छ संभाजीनगर जिल्हाप्रमुख विजय पाटिल वाघ याच्या अध्यक्षतेखालील वैजापूर येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसील कार्यालय येथे बेमुदत धरणे आंदोलन करण्यात आले वैजापूर तालुक्यात वाधळी गारपीटी मुळे शेतकऱ्यांचे अनोतिक काद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले त्या नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचे पचनामे व नुकसानभरपाई आध्यापही मिळाली नसल्यामुळे जनशक्ती शेतकरी सघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांसह वैजापूर तहसील कार्यालय येथे धरणे आंदोलन करून तालुक्यातील दहेगाव येथील शेतकरी ज्ञानेश्वर उगले या शेतकऱ्यांचे एक हजार कुठल काद्याचे त्वरित पंचनामा करून नुकसानभरपाई देण्यात यावी व तालुक्यात वाधळी गारपि मुळे बर्याच शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्याही शेतकऱ्यांच्या काद्याचे



त्वरित पचनामे करून नुकसानभरपाई देण्यात यावी ही मागणी घेऊन जनशक्ती शेतकरी सघटनेच्या पदाधिकारी व शेतकऱ्यांनी झोपल्याला शासनास जागी करण्यासाठी घोषणा देत नुकसान झाल्याला शेतकऱ्यांच्या काद्याचे पंचनामे त्वरित करा काद्याला हामी भाव देण्यात यावे शेतकऱ्यांच्या काद्याचे नुकसानभरपाई देण्यात यावी अशा घोषणा देण्यात आल्या तहसिलदार यानी अदोलन स्थळी भेट घेऊन लेखी पत्र दिले कि वैजापूर तालुक्यात एक ही शेतकरी वंचित राहणार नाही ते लेखी पत्र अदोलन कर्त व शेतकऱ्यांना देऊन अदोलन स्थगित करण्यात आले या वेळी युवा आघाडी जिल्हाप्रमुख सतोष पाटील सोनवणे वैजापूर तालुकाप्रमुख सतिष पा बारसे कन्नड तालुकाप्रमुख अशोक पा पवार तालुका कार्यधक्ष गणेश चाळक गणेश काकडे सतिष काकडे बाळु जानराव कल्याण जठार माधवराव त्रिभुवन रामहारी भोकरे अशोक काका जाधव कैलास शिंदे सचिन ढणारे ज्ञानेश्वर उगले रामचंद्र उगले व इतर पदाधिकाऱ्यांसह शेतकरी उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर